# महाराष्ट्र विधानपरिषद

## दुसरे अधिवेशन, २०२०

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक ०२ मार्च, २०२० / फाल्गुन १२, १९४१ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) उद्योग, खनिकर्म, मराठी भाषा मंत्री**<br>**(२) कामगार, राज्य उत्पादन शुल्क मंत्री**<br>**(३) ऊर्जा मंत्री**<br>**(४) बहुजन कल्याण, खार जमिनी विकास, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन मंत्री**<br>**(५) वने, भूकंप पुनर्वसन मंत्री**<br>**(६) आदिवासी विकास मंत्री**<br>**(७) सहकार, पणन मंत्री**<br>**(८) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ६३**

---

### श्री.पी.व्ही. हरदास समितीच्या अहवालाची सकारात्मकरीत्या अंमलबजावणी करणेबाबत

**(१) * ४४६ श्री.रमेशदादा पाटील, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड, श्री.निलय नाईक, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासप्रवर्ग अशा एकूण ४७ जाती-जमातींना न्याय मिळण्यासाठी व त्यांचे जात प्रमाणपत्र तातडीने सुपूर्द करण्यासाठी शासनाने श्री.पी.व्ही. हरदास समितीची स्थापना माहे जानेवारी, २०१९ च्या व्दितीय सप्ताहात केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.पी.व्ही. हरदास समितीने आपला सकारात्मक अहवाल माहे मे, २०१९ च्या शेवटच्या सप्ताहात शासनाकडे सुपूर्द केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अहवालाची पडताळणी व अभ्यास करून अहवालाचे कायद्यात रूपांतर करून अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१), (२) व (३) अनुसूचित जाती/जमातीच्या लोकांना जात प्रमाणपत्र वैधता प्राप्त करण्यासाठी येत असलेल्या अडचणींचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी दिनांक १४ जानेवारी, २०१९ च्या शासन निर्णयान्वये श्री.पी.व्ही. हरदास, माजी न्यायमुर्ती यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीने दिनांक २९/०५/२०१९ रोजी शासनास अहवाल सादर केलेला आहे. सदर अहवालाचा अभ्यास करुन अहवालातील शिफारशींसंदर्भात कायदेशीर बाबी तपासून त्याबाबत अभिप्राय देण्याबाबत प्रस्ताव विधी व न्याय विभागास सादर करण्यात आला आहे. विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात अनुसूचित जमातीच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला आरक्षण देण्याबाबत

**(२) * ५४३ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अनुसूचित जमातीच्या आरक्षणाला धक्का न लावता धनगर समाजाला आरक्षण देण्याची मागणी धनगर समाजाने केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्स, मुंबई यांनी धनगर समाजाबाबतचा अहवाल शासनास दिनांक ३१ ऑगस्ट, २०१८ रोजी वा त्यासुमारास सादर केला असून उक्त अहवालाच्या अनुषंगाने धनगर समाजाबाबत शासनास प्राप्त झालेल्या संशोधन/सर्वेक्षण अहवालाच्या अनुषंगाने धनगर समाजाच्या विविध मागण्यांवर विचार करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, धनगर समाजास शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याबाबत गेल्या अनेक वर्षांपासून विचाराधीन असलेल्या न्याय्य मागणीवर निर्णय घेण्यात आला आहे काय, निर्णयाचे स्वरुप काय आहे, निर्णय घेऊन आरक्षण देण्यासाठी किती कालावधी लागणार आहे, तसेच धनगर समाज आरक्षण आंदोलनात दाखल झालेले गुन्हे परत घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने धनगर समाजास शिक्षण व नोकरीमध्ये आरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१), (२), (३) व (४) धनगर समाजामार्फत त्यांना अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याची मागणी करण्यात आलेली आहे. मा.मंत्रिमंडळाच्या दिनांक २७ फेब्रुवारी, २०१९ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांचेकडून धनगर समाजाबाबत शासनास प्राप्त झालेल्या संशोधन व सर्वेक्षण अहवालाच्या अनुषंगाने धनगर समाजाच्या विविध मागण्यांवर विचार करण्यासाठी मंत्रिमंडळाची उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार यासंदर्भात दिनांक १ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये मंत्रिमंडळाची उपसमिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीच्या दिनांक २ मार्च, २०१९ रोजी संपन्न झालेल्या

बैठकीत टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांनी धनगर समाजाबाबत सादर केलेला अहवाल महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य यांना पाठवून त्यांचे अभिप्राय घेण्यात यावे असा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार धनगर समाजाबाबतचा टाटा सामाजिक विज्ञान संस्था, मुंबई यांचा अहवाल विधी व न्याय विभागामार्फत महाअधिवक्ता यांच्या अभिप्रायार्थ सादर करण्यात आलेला आहे. सदर प्रकरणीचे महाअधिवक्ता यांचे अभिप्राय प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही अपेक्षित आहे.

राज्यात धनगर आंदोलनादरम्यान गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. सदर खटले मागे घेण्याबाबत गृह विभागाने पोलीस महासंचालक यांच्याकडून अहवाल मागविला आहे.

सद्य:स्थितीत धनगर समाजास महाराष्ट्रात भटक्या जमाती (क) मध्ये आरक्षण देण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## समाजकल्याण विभागाकडे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित असल्याबाबत

**(३) * ३५९ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.निलय नाईक, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची थेट रक्कम जमा करण्याकरीता डीबीटी पोर्टल सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये विविध अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या ५ लाख ७२ हजार विद्यार्थ्यांनी विहित मुदतीत माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये शिष्यवृत्तीसाठी शासनाकडे अर्ज केल्याचे दिनांक ३ नोव्हेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ५ लाख ७२ हजार अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांपैकी केवळ १ हजार २४३ विद्यार्थ्यांच्या खात्यावरच शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाली असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीमध्ये काय आढळून आले, उर्वरित विद्यार्थ्यांच्या खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम जमा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) सन २०१९-२०२० या वर्षामध्ये दिनांक ११/०२/२०२० अखेर, महाडीबीटी पोर्टलवर भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती व फ्रिशिप प्रतिपूर्ती योजनेंतर्गत नोंदणीकृत झालेल्या अनुसूचित जातीच्या ४ लाख ६० हजार ७६० अर्जांपैकी ३ लाख ८९ हजार ४३९ अर्ज पात्र ठरलेले आहेत. त्यापैकी ३ लाख ५१ हजार २६३ अर्ज महाविद्यालयांनी मंजूर केलेले असून त्यापैकी २ लाख ७१ हजार ०३८ अर्जांचे रुपये ३७८ कोटी ३५ इतक्या रक्कमेची देयके महाडीबीटी पोर्टलव्दारे जनरेट करण्यात आलेली आहेत. त्यामधील १ लाख ४१ हजार ५२७ विद्यार्थ्यांची शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क व इतर शुल्काची रुपये १७१.१६ कोटी व निर्वाहभत्त्याची रुपये ३५.०३ कोटी अशी एकूण रुपये २०६.१९ कोटी इतकी रक्कम संबंधित विद्यार्थ्यांच्या महाडीबीटी पोर्टलवरील ई-वॉलेट वर वितरीत करण्यात आली आहे. उर्वरीत १ लाख २९ हजार ५११ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम रुपये १७२.१६ कोटी महाडीबीटी प्रणालीवरील (Pool account) व PFMS या प्रणालीव्दारे वितरणाची प्रक्रिया चालू आहे.

महाडीबीटी प्रणालीवर पात्र आढळून आलेल्या सर्व अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना माहे मार्च, २०२० अखेरपर्यंत शैक्षणिक लाभ अदा करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

-----------------

## राज्यातील वीज नियामक आयोगाचा प्रस्तावित मसुदा ग्राहकाभिमूख नसल्याबाबत

**(४) * ५४१ ॲड.निरंजन डावखरे, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील लाखो वीज ग्राहकांना, सौरऊर्जा ग्राहक, उत्पादक आणि उद्योजकांसाठी वीज नियामक आयोगाचा प्रस्तावित मसुदा घातक असल्याचा आरोप ठाणे लघु उद्योजक संघटनेने केल्याचे माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने सौरऊर्जेची निर्मिती, वापर, मिटरींग आणि बिलिंग याबाबतचा नवीन प्रारूप मसुदा सूचना तसेच हरकतीसाठी जाहीर केला असून या मसुद्यानुसार तीनशे युनिटपर्यंत घरगुती वीज वापरासाठी नेट मिटरिंग लागू राहणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तीनशे युनिटपेक्षा जास्त वापरलेल्या विजेसाठी स्थिर आकार अधिक वीज आकार किमान ११.१८ पैसे प्रतियुनिट किंवा त्याहून अधिक दराने वीज देयक भरावे लागणार आहे तसेच अशा प्रकारच्या नवीन मसुद्याच्या प्रारूपामुळे ३ किलो व्हॅटच्यावर सौरऊर्जा निर्मितीला चालना मिळणार नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर नवीन प्रारूपामुळे औद्योगिक विकास व पर्यायाने राज्याच्या विकासावर परिणाम होणार असल्याने सदर प्रारूप मसुदा दुरुस्तीबाबत शासन निर्णय घेणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) होय, ठाणे लघु उद्योजक संघटनेने मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाकडे प्रारूप ग्रीडला जोडलेली परस्पर सक्रीय छपरावरील नुतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा विनियम, २०१९ च्या मसुद्याबाबत सूचना व हरकती उपस्थित केल्या होत्या.

(२) महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने ग्रीडला जोडलेली परस्पर सक्रीय छपरावरील नुतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा विनियम, २०१९ च्या प्रारूप मसुद्यामध्ये ३०० युनिटपर्यंत घरगुती वीज वापरासाठी नेट मिटरींग लागू करण्याचे प्रस्तावित होते. परंतु, आयोगाने दिनांक ३०/१२/२०१९ रोजी जाहीर केलेल्या या संदर्भातील अंतिम विनियमामध्ये सदरची मर्यादा काढून टाकण्यात आली आहे.

(३) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक २६ ऑक्टोबर, २०१९ च्या जाहीर सूचनेनुसार प्रारूप विनियम मसुद्यामध्ये ३०० युनिटपेक्षा अधिक वीज वापराकरीता मान्यता दिलेल्या फेजनिहाय व श्रेणीनिहाय ग्रीड वीज दराने देयक देण्याची तरतुद केली होती. परंतु, दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी जाहीर केलेल्या या संदर्भातील अंतिम विनियमात जर ग्राहकाने आयात केलेल्या विजेचे युनिट हे त्याने निर्यात केलेल्या विजेच्या युनिटपेक्षा जास्त असतील तर वितरण परवानाधारक विजेच्या जमा युनिटचे समायोजन करून नक्त वीज वापरासाठी देयक देण्याची तरतुद आहे.

(४) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने या विनियमासंदर्भात प्राप्त विविध हरकती व सूचना विचारात घेऊन दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी जाहीर केलेल्या अंतिम विनियमानुसार नक्त मापन (Net Metering) व्यवस्था सर्व वर्गवारीतील वीज ग्राहकांसाठी लागू झाली असून औदयोगिक ग्राहकांनाही त्याचा लाभ घेता येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मराठी भाषा विद्यापीठाची राज्यात स्थापना करण्याबाबत

**(५) * ६ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, श्री.विलास पोतनीस, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना करण्याबाबतची मागणी गेल्या ८० वर्षापासून तसेच सन २००७ मध्ये वा त्यादरम्यान नागपूर येथे झालेल्या साहित्य महामंडळाच्या संमेलनातदेखील तशी मागणी शासनाकडे करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भाषा सल्लागार समितीचे माजी अध्यक्ष डॉ.सदानंद मोरे यांनी मराठी भाषा धोरणाचा मसुदा माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान शासनास सादर केलेला असून शासनाच्या सर्व विभागांकडून शिफारशी मागवून हा मसुदा मंत्रिमंडळापुढे मांडून त्यावर निर्णय घेणे अपेक्षित असताना सुमारे सव्वा तीन वर्षांचा कालावधी लोटल्यानंतरही त्यावर कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बडोदा येथे दोन वर्षापूर्वी अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनामध्ये तत्कालीन मा.मुख्यमंत्री तसेच तत्कालीन मा.मराठी भाषा विकास मंत्री यांनी मराठी भाषा विद्यापिठासह मराठी भाषेच्या धोरणाविषयाच्या सर्व मागण्या निकालात काढण्यात येतील अशी घोषणा करुन मराठी विद्यापिठासाठी राज्याची उच्चाधिकार समिती तयार करण्याची कार्यवाही सुरु असल्याचे जाहीर केले होते, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात मराठी विद्यापीठ स्थापन करण्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे व त्यानुसार मराठी भाषा विद्यापीठ स्थापन करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय.

(२) भाषा सल्लागार समितीने सादर केलेल्या मराठी भाषा धोरणाच्या मसुद्यावर विविध मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय घेण्यात आले असून त्यानुसार सुधारित मसुद्यावर धोरणात्मक निर्णय घेण्याची बाब विचाराधीन आहे.

(३) व (४) बाबत राज्यात मराठी भाषा विद्यापीठाची स्थापना करण्यासाठी विविध बाबींचा अभ्यास करण्याच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेतकऱ्यांची आर्थिक लूट बँकेचे अधिकारी व दलालामार्फत होत असल्याबाबत

**(६) * ७८१ श्री.अंबादास दानवे, श्री.विप्लव बाजोरिया, श्री.आनंदराव पाटील, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.शरद रणपिसे, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, ॲड.हुस्नबानू खलिफे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळूनही किरकोळ व्याजापोटी अनेक शेतकऱ्यांना कर्जबाजारी ठरविले जात असून त्यांना पीक कर्ज देताना बँकाकडून अडवणूक केली जात असल्याचे दिनांक १४ जुलै, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान अतिवृष्टीमुळे ज्या शेतकऱ्यांच्या पिकांचे नुकसान झाले अशा शेतकऱ्यांची नुकसान भरपाईची रक्कम बँकाकडे सुपूर्द केली असून काही बँकाकडून शेतकऱ्यांना अर्थसहाय्य वितरण विलंबाने केले जात आहे तसेच किनवट येथील नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अधिकारी व दलाल यांच्याकडून क्रमवारी डावलून अनुदानाची रक्कम वाटप केली जात असून सदर अनुदान त्वरीत मिळण्याबाबत शेतकऱ्यांकडून ५००/- रुपयांची मागणी करण्यात येत असल्याचेही माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कर्जवाटपाच्या उद्दिष्टाच्या फक्त २० टक्के पीक कर्ज वाटप झाले असून यासंदर्भात शासनाने आढावा घेवून शेतकऱ्यांची बँकाकडून पीक कर्जापासून होणारी अडवणूक थांबविण्याबाबत व शेतकऱ्यांना बँकेकडील निधी वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) नाही.
(३) सन २०१९-२०२० हंगामामध्ये राज्यातील बँकांना खरीप हंगामामध्ये रुपये ४३,८४४.२९ कोटी व रब्बी हंगामामध्ये रुपये १५,९२१.४५ कोटी असा एकूण रुपये ५९,७६५.७४ कोटीचा लक्षांत देण्यात आला. त्यापैकी खरीप हंगामात रुपये २१,४८३.६२ कोटी (४९%) व दिनांक ३१/०१/२०२० अखेर बँकांनी रब्बी हंगामात ४२८४.२१ कोटी (२७%) पीक कर्ज वाटप केले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अवकाळी पाऊस व गारपीठमुळे पिकांचे नुकसान झाल्याबाबत

**(७) * ८४७ डॉ.परिणय फुके, श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रकाश गजभिये, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती स्मिता वाघ, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.महादेव जानकर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.मोहनराव कदम, श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.रमेशदादा पाटील, श्री.निलय नाईक, श्री.विनायकराव मेटे, श्री.सुजितसिंह ठाकूर, श्री.अरुणभाऊ अडसड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: विदर्भातील नागपूर, अमरावती, यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, वर्धा, अकोला व वाशिम जिल्ह्यात आणि मराठवाड्यात नांदेड, हिंगोली व परभणी या जिल्ह्यात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टी, गारपीट तसेच माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पाऊसामुळे शेतकऱ्यांच्या धान, सोयाबीन, कापूस खरीप पिकांचे ७० टक्के नुकसान व रब्बी हंगामातील गहू, तूर, हरभरा, धना, डाळी, संत्रा, मोसंबी या पिकांचे नुकसान झाल्याचे दिनांक ३ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कर्जबाजारीपणा, दुष्काळी परिस्थिती, पीक विम्याच्या लाभापासून वंचित, शेतमालाच्या दरातील तफावत इत्यादी कारणामुळे विदर्भात मागील ११ महिन्यात ११०० शेतकऱ्यांनी व मराठवाड्यात एका महिन्यात ७४ शेतकऱ्यांनी तसेच राज्यात एका महिन्यात ३०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची माहिती दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे पीक नुकसान भरपाईपासून लाखो शेतकरी वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले असून राज्यात किती हेक्टर शेती पिकांचे नुकसान झाले आहे व किती शेतकऱ्यांना पीक नुकसान भरपाई देण्यात आली आहे,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देऊन शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) होय.

(२) विदर्भातील नागपूर व अमरावती महसुली विभागातील ११ जिल्ह्यात १ जानेवारी, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९ या कालावधीत एकूण १२८६ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. त्यापैकी ५७६ आत्महत्यांची प्रकरणे पात्र ठरली असून ४४८ प्रकरणे अपात्र ठरली, तर २६२ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

मराठवाडा महसूल विभागातील ८ जिल्ह्यात डिसेंबर, २०१९ या एका महिन्यात एकूण १०२ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. त्यापैकी ५४ प्रकरणे पात्र ठरली असून १० प्रकरणे अपात्र ठरली आहेत. तर ३८ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

राज्यात डिसेंबर, २०१९ या एका महिन्यात २४२ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या आहेत. त्यापैकी ५९ प्रकरणे पात्र ठरली असून १२ प्रकरणे अपात्र ठरली आहेत व १७३ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

(३) हे खरे नाही.

अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे शेतीपिकाचे नुकसानीसाठी दिनांक १८/११/२०१९ रोजी रुपये २०५९३६.६५ लाख, दिनांक १३/१२/२०१९ रोजी रुपये ४५००००.०० लाख आणि दिनांक ०१/०२/२०२० रोजी ७५०००.०० लाख अशा प्रकारे तीन हप्त्यात रुपये ७३०९३६.६५ लाख निधीचे वितरण करण्यात आले आहे. त्यापैकी ६६९०८२.२४ लाख निधीचे वाटप ९३.८६ लाख शेतकऱ्यांना बँकांमार्फत करण्यात आलेले आहे. उर्वरित निधी वाटपाचे काम सुरू आहे.

(४) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी खालील उपाययोजना राबविण्यात येतात.

(अ) दिनांक १९/१२/२००५ च्या शासन निर्णयान्वये विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, वाशिम, वर्धा या जिल्ह्यात आत्महत्येचे प्रमाण जास्त असलेल्या सहा जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या विकासासाठी व कल्याणासाठी विविध उपाययोजना अंतर्भूत असलेल्या विशेष पॅकेज देण्यात आले आहे.

(आ) शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी शेतकऱ्यांना समुपदेशन तसेच प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन दिनांक २८/०४/२०१४ च्या शासन परिपत्रकान्वये विविध उपाययोजना करण्यात येत आहेत.

(इ) दिनांक २४/०७/२०१५ च्या शासन निर्णयानुसार आत्महत्याग्रस्त भागातील शेतकऱ्यांच्या विकासासाठी कृषी समृध्दी योजनेच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभाग, सहकार विभाग, जलसंधारण विभाग, कृषी व पणन विभाग, जलसंपदा विभाग, पदुम विभाग, नियोजन विभाग (रोहयो), महिला व बालविकास विभाग, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग या विभागामार्फत विविध योजना राबविण्यात येतात.

(ई) दिनांक २४/०७/२०१५ च्या शासन निर्णयानुसार आत्महत्याग्रस्त क्षेत्रासाठी जिल्हास्तरीय/ग्रामस्तरीय समित्या, यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यात बळीराजा चेतना अभियान राबविणे अशा प्रकारचा विशेष मदतीचा कार्यक्रम राबविण्यात येतो.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कंबाटा एव्हीएशन प्रा.लि. कंपनीतील कर्मचाऱ्यांबाबत**

**(८) * १५९ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.ख्वाजा बेग, श्रीमती विद्या चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक ४१३८० ला दिनांक ११ जुलै, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंबाटा एव्हीएशन प्रायव्हेट लिमिटेड कंपनी दिनांक १० ऑगस्ट, २०१६ रोजी वा त्यासुमारास बंद पडल्याने ३००० कर्मचारी बेकार झाले असून आतापर्यंत १२ कर्मचाऱ्यांचे मृत्यू होणे तसेच बेरोजगार कर्मचाऱ्यांची हक्काची देणी थकीत असून त्यांना ती मिळाली नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात माहे मार्च, २०१६ पासून विविध संसदीय माध्यमातून विधिमंडळात प्रश्न उपस्थित करण्यात येणे, तसेच मा.सभापती महोदयांच्या दालनात संबंधित अधिकारी, मा.मंत्री महोदय यांच्या बैठका आयोजित करण्यात आल्या, परंतु कामगारांची देणी मिळण्याबाबत वारंवार पाठपूरावा करुनही कार्यवाहीस विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, ३००० कर्मचाऱ्यांची थकीत देणी देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) मे.कंबाटा एव्हिएशन प्रा. लि. कंपनीतील कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधी बाबतची थकीत रक्कम केंद्र शासनाच्या भविष्य निर्वाह निधी विभागाने वसूल केली असून ऑक्टोबर, २०१७ ते जानेवारी, २०२० पर्यंत एकूण २६९२ दावे निकाली काढले असून भविष्य निर्वाह निधीच्या रकमेतून रुपये २९,१२,३९,७४४/- इतकी रक्कम संबंधितांना प्रदान करण्यात आलेली आहे.

(२) व (३) सदर आस्थापनेकरीता समुचित शासन हे केंद्र शासन असून विविध कामगार कायद्यांची अंमलबजावणी करण्याचे काम प्रादेशिक श्रम आयुक्त, मुंबई (केंद्र शासन) यांचेमार्फत केले जाते.

भविष्य निर्वाह निधीबाबतची थकीत रक्कम केंद्र शासनाच्या भविष्य निर्वाह निधी विभागाने वसूल केली आहे. तसेच, सदर आस्थापना, संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याविरुध्द भविष्य निर्वाह निधी अधिनियमाचे उल्लंघन केले म्हणून फ़ौजदारी खटले दाखल केले आहेत.

केंद्र शासनाचे प्रादेशिक श्रम आयुक्त यांनी सदर कामगारांच्या थकीत वेतनासंदर्भात एकूण रक्कम रुपये ३४,८६,६५,७७२/- इतकी देणी निश्चित केली आहे. सदर देणी वसूल करण्यासंदर्भात मे.मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. (MIAL) यांना वसूली नोटीस पाठविण्यात आलेली होती. परंतु, मे.मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. (MIAL) यांनी सदर नोटीसीच्या विरुध्द मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून न्यायालयाने सदर वसूली नोटीसला स्थगिती दिली आहे. त्यामुळे सदर प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

या व्यतिरिक्त मे.कंबाटा एव्हिएशन प्रा.लि. येथील १३० कामगारांनी औद्योगिक न्यायालय, मुंबई येथे थकीत वेतनासंदर्भात एम.आर.टी.यु. अँड पी.यु.एल.पी. ॲक्ट (Maharashtra Recognition of Trade Unions Act and Prevention of Unfair Labour Practices Act) या अधिनियमांतर्गत तक्रार दाखल केली असून त्याअन्वये थकीत वेतनाची वसूली कार्यवाही महसूल विभागामार्फ़त करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी मे.कंबाटा एव्हिएशन प्रा.लि. यांचे बँकेचे खाते गोठवून व वाहनांचे भाडे वसूलीव्दारे एकूण रुपये ३७,३७,४८५/- एवढी रक्कम न्यायालयात जमा केलेली आहे. मे.कंबाटा यांच्या मालकीची वाहने व यंत्रे यांचा लिलाव करण्यासंदर्भात तहसिलदार, मुंबई उपनगर यांच्यामार्फ़त कारवाई करण्यात आली होती. परंतु, सदर प्रकरणात मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १४/०१/२०२० रोजीच्या आदेशान्वये मे.मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि. यांना लिलाव करण्याचे आदेश दिलेले आहेत. या आदेशासोबत देण्यात आलेल्या लिलाव करावयाच्या वाहनांच्या तपशीलामध्ये बदल करुन मिळावा किंवा मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४/०१/२०२० रोजी

दिलेल्या आदेशामध्ये बदल करावा म्हणून मे.मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा. लि. यांनी मा.मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

मे.कंबाटा एव्हिएशन प्रा.लि. या आस्थापनेतील परिणामित कामगारांपैकी सुमारे ७५३ कामगारांना मे.बी.डब्ल्यू.एफ.एस. व मे.सेलिबिनास या ग्राऊंड हॅंडलिंग एजन्सीमध्ये नव्याने नियुक्त करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात विविध अभ्यासक्रमाच्या महाविद्‌यालयांमध्ये विद्‌यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये गैरव्यवहार झाल्याबाबत

**(९) * ७२२ श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००८-२००९ मध्ये विविध अभ्यासक्रमाच्या महाविद्‌यालयांमध्ये अनुसूचित जाती व ओबीसी प्रवर्गातील विद्‌यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीमध्ये २ हजार १७४ कोटी रूपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर अचानक अनेक महाविद्‌यालये बंद झाली आहेत तसेच या शिष्यवृत्तीमध्ये झालेल्या गैरव्यवहारामुळे राज्याचा अर्थसंकल्प ६-७ वर्षात एक हजार कोटीहून साडेतीन हजार कोटीवर गेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आल्यानंतर या गैरव्यवहाराची चौकशी अत्यंत संथगतीने सुरू आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती वाटपातील अनियमिततेबाबत विशेष चौकशी पथकाने सादर केलेल्या अंतिम चौकशी अहवालातील लेखा परीक्षणाच्या आकडेवारीची पडताळणी समाजकल्याण आयुक्तालयामार्फत पूर्ण करुन, त्याबाबतचा अनुपालन अहवाल गृह विभागास सादर करण्याची कार्यवाही अंतिम टप्प्यात आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील आश्रमशाळांमध्ये पूर्णवेळ कला व क्रीडा शिक्षक भरणेबाबत

**(१०) * ९९० डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा : दिनांक २८ फेब्रुवारी, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक ४५२०१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील आश्रमशाळांना कला व क्रीडा शिक्षक हे पूर्णवेळ पद नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्या क्रीडा शिक्षकांचे पद पूर्णवेळ नसल्यामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुंणाना वाव मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कला व क्रीडा शिक्षकांचे पदनिर्मितीचे धोरण काय आहे व आश्रमशाळांमध्ये विनाविलंब क्रीडा शिक्षकांची नेमणूक करण्याच्यादृष्टीने शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१), (२) व (३) राज्यातील प्रत्येक शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या क्रीडा गुणांना वाव मिळण्याकरीता आदिवासी विकास विभागाच्या शासन निर्णय, दिनांक ०६/०३/२०१८ नुसार कंत्राटी पध्दतीने क्रीडा शिक्षक/क्रीडा मार्गदर्शकाची (Coach) नियुक्ती करणेसाठी मान्यता प्रदान करण्यात आली आहे. तसेच शासन निर्णय, दिनांक १३/०६/२०१९ नुसार शासकीय आश्रमशाळेसाठी कला (कार्यानुभव) शिक्षक कंत्राटी पध्दतीने भरण्याबाबत शासन मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्यानुसार शासकीय आश्रमशाळांमध्ये ३३१ क्रीडा शिक्षक/क्रीडा मार्गदर्शकाची (Coach) व २१७ कला (कार्यानुभव) शिक्षक पूर्णवेळ भरण्यात आले असून उर्वरीत शाळांमध्ये भरती प्रक्रिया सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील कारखाने बंद पडल्यामुळे कामगार बेरोजगार झाल्याबाबत

**(११) * ६१९ आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.रामहरी रुपनवर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जनार्दन चांदूरकर :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २०१७-२०१८ या कालावधीत किमान ८०० ते ८५० कारखाने बंद पडल्यामुळे लाखो कामगार बेरोजगार झाल्याचे दिनांक १० ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सध्या बंद पडलेले कारखाने पूर्ववत सुरु करुन कामगारांना काम मिळावे यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१), (२) व (३) चौथ्या अखिल भारतीय प्रगणनेनुसार माहे मार्च, २००७ अखेर राज्यात बंद असलेल्या सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांची संख्या ही ३७,७५३ इतकी आहे. त्यानंतर औद्योगिक प्रगणना झालेली नाही.

तथापि, कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई याच्याकडून प्राप्त झालेल्या अहवालानुसार राज्यामध्ये सन २०१७-१८ या कालावधीत ३१७ कारखाने बंद असल्याचे व त्यामुळे १४,७८७ कामगार बाधित झाल्याचे निदर्शनास आले आहे.

औद्योगिक आस्थापना बंद झाल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर संबंधित कार्यालयाकडून त्याबाबत चौकशी करुन, उभयपक्षीय बैठकांचे आयोजन करण्यात येते. संप /टाळेबंदी इ. कामगार प्रश्नांमुळे आस्थापना बंद झाली असल्यास, उभयपक्षांमध्ये तडजोड घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले जातात.

महाराष्ट्र औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २५ (ओ) अन्वये सन २०१७-१८ मध्ये शासनस्तरावर १०० पेक्षा जास्त कामगार असलेल्या आस्थापना बंद करण्याच्या अनुषंगाने ४ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी एक अर्ज व्यवस्थापनाने मागे घेतला. तर २ अर्ज नाकारण्यात आले आहेत. एक प्रकरण नॅशनल कंपनी लॉ ट्रिब्यूनल यांच्याकडे प्रलंबित असल्याने, शासनस्तरावर कार्यवाही केलेली नाही.

सन २०१७-१८ या कालावधीत ५० पेक्षा अधिक कामगार असलेल्या १२ आस्थापनांमध्ये कामगारांनी संप केल्याचे आढळून आले. त्यापैकी १० संपांमध्ये तडजोड घडवून आणण्यात संबंधित यंत्रणेला यश आले आहे. ४ आस्थापनांमध्ये व्यवस्थापनाने टाळेबंदी सुरु केली असल्याचे आढळून आले.

तसेच राज्याच्या औद्योगिक धोरणामध्ये "पुनरुज्जीवनक्षम नसलेल्या तसेच बंद असलेल्या उपक्रमांना सुलभ निर्गमन पर्याय उपलब्ध होण्यासाठी" राज्य शासनाने वेळोवळी "विशेष अभय योजना" जाहीर केली आहे. सदर विशेष अभय योजनेचा वैधता कालावधी दिनांक ३१ मार्च, २०१७ पर्यंत होता. शासनाने नुकतेच नवीन औद्योगिक धोरण सन २०१९ मध्ये जाहीर केले असून, सदर धोरणात विशेष अभय योजनेचा समावेश आहे. तसेच बंद पडलेल्या औद्योगिक उपक्रमांच्या जमिनी मुक्त करण्याबाबत धोरण जाहीर केले आहे. जेणेकरून राज्यात उद्योगांत गुंतवणूक व रोजगार वाढीसाठी प्रोत्साहन मिळू शकेल.

-----------------

## बीड जिल्हयातील शासकीय कापूस खरेदी केंद्रातील अनियमिततेबाबत

**(१२) * ११७८ श्री.विनायकराव मेटे, श्री.सदाशिव खोत : दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या यादी क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक ४६७६१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्हयात कापूस खरेदीसाठी पणन महासंघाकडून कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मैंदा (पोखरी) ता.जि.बीड येथील कापूस खरेदी केंद्रास पणन महासंघाने मंजुरी दिली असून या कापूस खरेदी केंद्रात कापूस चांगला नाही असे सांगून बेभाव कापूस घेतला जातो किंवा खरेदीच केला जात नाही तसेच येथील कापूस खरेदी केंद्रावर कवडीच्या (कडती) नावाखाली ७ ते ११% कापूस कपात केली जाते यासह अनेक गैरव्यवहार होत असल्याने शेतकऱ्यांनी व अनेक संघटनांनी प्रशासनाला निवेदने सादर केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गैरव्यवहार निदर्शनास आल्याने दिनांक ०९ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास कापूस खरेदी केंद्रात जाणीवपूर्वक आग लावण्याचे षडयंत्र येथील केंद्र चालकाने गैरव्यवहार लपविण्याकरीता केले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन या केंद्रावर व केंद्र चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय, बीड जिल्हयात कापूस पणन महासंघाकडून कापूस खरेदी केंद्रे सुरु करण्यात आली आहेत.

(२) होय, मैंदा (पोखरी) ता.जि.बीड येथील कापूस खरेदी केंद्रास पणन महासंघाने मंजूरी दिली आहे. केंद्र शासनाने जाहीर केलेल्या किमान आधारभूत (रुपये ५३५५ ते रुपये ५५५० प्रति क्विंटल) दराने एफएक्यू दर्जाच्या (८ ते १२% आर्द्रता) कापसाची खरेदी केली जात आहे. त्यामुळे कवडीच्या नावाखाली कापूस कपात केली जात नाही.

सदर कापूस खरेदी केंद्रावर गैरव्यवहार होत असल्याबाबत एका शेतकऱ्याने कापूस पणन महासंघाकडे दूरध्वनीद्वारे तक्रार केली होती.
(३) व (४) नाही.

कापूस पणन महासंघाच्या विभागीय व्यवस्थापकांनी दूरध्वनीद्वारे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने सदर कापूस खरेदी केंद्रास प्रत्यक्ष भेट देऊन तपासणी केलेली असून त्यात कोणताही गैरव्यवहार आढळून आलेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## देवरी (जि.गोंदिया) आदिवासी प्रकल्पांतर्गत राबविल्या जाणाऱ्या योजनेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(१३) * ५०९ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सन २००४ ते २००६ या वर्षात आदिवासी प्रकल्पांतर्गत देवरी (जि.गोंदिया) येथील आदिवासींसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनेत १५ लाख ७ हजार ६०८ रूपयांचा गैरव्यवहार झाल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) व (२) सन २००४-२००९ या कालावधीत आदिवासी विकास विभागाच्या विविध योजनांच्या अंमलबजावणीमध्ये झालेल्या अनियमिततेसंदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार गठित करण्यात आलेल्या न्या.गायकवाड समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, देवरी येथील तत्कालीन दोन प्रकल्प अधिकारी यांच्याविरुध्द पोलीस स्टेशन देवरी येथे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महापूर व पुराचा इशारा देणारी यंत्रणा प्रस्थापित करण्याबाबत

**(१४) * ६८ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.प्रविण दरेकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेशदादा पाटील, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात मुंबई, पुणे, कोल्हापूर, सांगली व सातारा आदि ठिकाणी यावर्षी माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान आलेल्या महापुरामुळे नागरिकांची जिवितहानी व संपत्तीचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र शासनाच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे सचिव यांनी चेन्नईच्या पध्दतीची यंत्रणा मुंबई महानगरपालिका व राष्ट्रीय तटीय संशोधन केंद्र यांच्या मदतीने पृथ्वी विज्ञान मंत्रालयाच्यावतीने मुंबई येथे करणार असल्याचे दिनांक ११ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या यंत्रणेमुळे पुरासंदर्भातील इशारा झालेला पाऊस, किती पाणी ओसरले, भरतीच्या लाटांची उंची व अपेक्षित पाऊस याबाबी २४ तास आधी राज्यातील जनतेस कळणार असल्याचेही केंद्रीय सचिव, पृथ्वी विज्ञान, मंत्रालय यांनी त्याच सुमारास सांगितले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात गेल्यावर्षी झालेल्या प्रलंयकारी महापूराची दखल संयुक्त राष्ट्रांनी (युएन) ने घेतली असून भविष्यात या दोन जिल्ह्यात महापुराची आपत्ती उद्‌भवल्यास आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करण्याची सूचना संयुक्त राष्ट्रांनी जपानला केली त्यानुसार स्थानिक अधिकाऱ्यांच्या व शासनाच्या सहभागातून या आराखड्याच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यात वा मुंबईमध्ये सदर यंत्रणा प्रस्थापित करण्याच्यादृष्टीने तसेच या पुरबाधित कुटुंबे, घरे, सिंचन प्रकल्पाचे नुकसान, शेती, महावितरणचे झालेले नुकसान, इतर सर्व प्रकारे झालेले नुकसान भरुन काढण्यासाठी कृती आराखडा तयार करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) होय.

(२) होय.

(३) चैन्नईच्या धर्तीवर पूरासंदर्भातील पूर्व इशारा प्रणाली विकसित करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

(४) नाही.

(५) व (६) बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत बृहन्मुंबईकरीता तयार करण्यात आलेला आपत्तकालीन व्यवस्थापन आराखडा सन २०१८ मध्ये अद्ययावत करुन आपत्तकालीन व्यवस्थापन विभागाच्या संकेतस्थळावर (dm.mcgm.gov.in) उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सन २०१८ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार मुंबई शहर व उपनगर जिल्ह्याकरीता दोन स्वतंत्र आपत्कालीन व्यवस्थापन आराखडे तयार करण्यात आले आहेत.

-----------------

## बेस्ट, अदानी व टाटा समुहाकडून पारेषण शुल्क वाढीच्या प्रस्तावाबाबत

**(१५) * २६८ श्री.विलास पोतनीस, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई शहर व उपनगरात महावितरणासह बेस्ट, अदानी व टाटा समुहाकडून विजेचा पुरवठा होत असून उक्त वीज पुरवठा करणाऱ्या कंपन्यांकडून पारेषण शुल्कात वाढीचा प्रस्ताव महापारेषणमार्फत महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे बहुवार्षिक म्हणजे २०२०-२०२१, २०२१-२०२२, २०२२-२०२३, २०२३-२०२४ आणि २०२४-२०२५ असा ५९२७ कोटी रुपयांचा वीज दरवाढीचा प्रस्ताव दाखल केला असून आयोगाने महावितरणची ही वीज दरवाढीची याचिका दिनांक १३ जानेवारी, २०१९ रोजी दाखल करून घेतल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणने केलेल्या दरवाढीचा उच्चदाब, लघुदाब, वीज ग्राहकांना, उद्योग आणि कृषी वीज ग्राहकांना ही फटका बसणार असून दरवाढीच्या प्रस्तावात सरासरी एक ते पाच टक्के वाढ दर्शविण्यात आली असली तरी प्रत्यक्षात मात्र हा वीज दरवाढीचा प्रस्ताव थेट २०% असल्याचे निदर्शनास येत असल्याने राज्यातील जिल्हा परिषद शाळा आणि इतर शाळांना देण्यात येणारी वीज घरगुती दराने देण्याबाबतचे शासनाने धोरण काय आहे तसेच घरगुती वीज दर वाढत असताना लावण्यात येणारे सर्व कर एकत्र करुन एकच कर लावण्यात येणार काय व या प्रस्तावावर महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाने काय निर्णय घेतला आहे,

(३) असल्यास, राज्यातील वीज ग्राहकांवर माहे एप्रिल, २०२० पासून दरवाढीची टांगती तलवार असताना, त्याआधीच महावितरणने इंधन समायोजन आकाराच्या रूपाने माहे जानेवारी, २०२० पासून वीज वापरापोटी प्रतियुनिट ५५ पैसे ते १.४० रुपयांचा भार वीज ग्राहकांवर टाकला असल्याने, आता ग्राहकांना येत्या महिन्यापासून मासिक वीज बिलामध्ये साधारण २०० ते ३०० रुपये अतिरिक्त मोजावे लागणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू वार्षिक दरवाढीच्या प्रस्तावावर वीज नियामक आयोग निर्णय घेणार आहे. मात्र त्याआधीच माहे ऑक्टोबर, २०१९ मधील वीज खरेदीवरील खर्चापोटी इंधन समायोजन आकार वसूल करण्याचा निर्णय महावितरणने घेतला आहे. इतकेच नव्हे तर माहे जानेवारी, २०२० चे वीज देयक तयार करताना सर्व गटातील ग्राहकांवर हा आकार लावण्याचा आदेश महावितरणने राज्यातील सर्व परिमंडळाना दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार महावितरणच्या या वीज दरवाढीमुळे वीज ग्राहकांवर पडणारा अतिरिक्त मासिक भार दूर करण्याचेदृष्टीने कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) मुंबई महानगर व मुंबई उपनगर परिसरात बेस्ट, अदानी आणि टाटा पॉवर कंपनीकडून ग्राहकांना वीज पुरवठा करण्यात येतो. तसेच मुंबई उपनगरातील मुलुंड, भांडुपसह राज्यातील इतर भागातील ग्राहकांना महावितरणकडून वीज पुरवठा करण्यात येतो. या सर्व वीज वितरण कंपन्या ग्राहकांपर्यंत वीज पोहोचवण्यासाठी वीजनिर्मिती कंपन्यांकडून विजेची खरेदी करुन पारेषण यंत्रणेमार्फत ग्राहकांपर्यंत पोहोचवत असतात. या सर्व बाबींचा (वीज खरेदी, पारेषण व वितरण) खर्च विचारात घेऊन ग्राहकांसाठी लागू करावयाचे वीज दर ठरवण्यात येतात.

पारेषण शुल्काबाबत प्रस्ताव सादर केलेला नाही. तथापि, महाराष्ट्रात वीज पुरवठा करणाऱ्या सर्व वीज वितरण कंपन्यांनी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीजदर) विनियम, २०१९ नुसार सन २०२०-२०२१ ते सन २०२४-२०२५ या कालावधीसाठी स्वतंत्रपणे वीज दराच्या निश्चितीकरणासाठी आयोगासमोर प्रस्ताव सादर केलेले आहेत.

(२) विद्युत अधिनियम, २००३ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास वीज वितरण परवानाधारकांच्या ग्राहकांचे वीजदर निश्चित करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (बहु-वर्षीय वीजदर) विनियम, २०१९ नुसार आयोगासमोर निश्चितीकरणासाठी आलेले वीजदर हे दिनांक १/०४/२०२० पासून लागू होणे अपेक्षित असून महावितरण, बेस्ट, अदानी व टाटा पॉवर कंपन्यांकडून वीज संदर्भातील याचिकांची आयोगामार्फत छाननी, शहानिशा, ग्राहकांच्या सूचना व हरकतीबाबत जाहीर सुनावणी घेऊन अंतिम करण्यात येत असून, सद्य:स्थितीत त्या आयोगासमोर न्यायप्रविष्ट आहेत.

प्रचलित वीज दर आदेशानुसार राज्यातील जिल्हा परिषद शाळा आणि इतर शाळांना देण्यात येणारी वीज ही अनुक्रमे सार्वजनिक सेवा (शासकीय) व सार्वजनिक सेवा (इतर) या उपवर्गवारीच्या दरानुसार आकारण्यात येते.

(३) व (४) महावितरण कंपनी विविध स्त्रोताकडून वीज खरेदी करीत असलेल्या विजेचा एकूण खर्च तसेच करावयाची एकूण विजेची खरेदी महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग मंजूर करते व विविध वर्गवारीतील ग्राहकांना आकारण्यात येणारे दर निश्चित करण्यात येत असतात. तथापि, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने मंजूर केलेल्या वीज खरेदी खर्चापेक्षा प्रत्यक्षात वीज खरेदीचा खर्च कमी अथवा अधिक झाल्यास अशा खर्चाची वसुली अथवा समायोजन हे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या बहुवार्षिक वीजदर विनियमाच्या तरतुदीनुसार, इंधन समायोजन आकाराच्या माध्यमातून करण्यात येत असते. म्हणजेच सदर इंधन समायोजन आकार हा महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या बहुवार्षिक वीजदर विनियमाच्या तरतुदीनुसार दर महिन्याच्या वीज बिलामध्ये लागू करण्यात येतो.

माहे जानेवारी, २०२० च्या बिलामध्ये प्रतियुनिट ५५ पैसे ते १.४० रुपया दरम्यान ग्राहकांच्या वर्गवारीनुसार इंधन समायोजन आकार हा लावण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यातील चिपी विमानतळ सुरु करण्याबाबत

**(१६) * ७४१ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग व कोकण परिसराच्या विकासाला योगदान ठरणारे चिपी विमानतळ टर्मिनलचे दिनांक ५ मार्च, २०१९ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री व केंद्रिय हवाई वाहतूक मंत्री यांच्या हस्ते उद्घाटन होवून एक वर्षाचा कालावधी संपत आला असूनही चिपी विमानतळ सुरु करण्यात आले नसल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिपी विमानतळ टर्मिनलचे उद्घाटन होवूनही विमानतळ सुरु न होण्यामागची कारणे काय आहेत, याबाबत शासनाने चौकशी करुन सदर विमानतळ सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) भारतीय विमानतळ प्राधिकरण (AAI) याच्या मानकाप्रमाणे विमानतळाच्या उभारणीसाठी आवश्यक पायाभूत सुविधा, उपकरणे, अखंडीत विद्युत पुरवठा इ.बाबींची पुर्तता करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील बाजार समितीसाठी आरक्षित जमीन विकासकाला देण्यात येत असल्याबाबत

**(१७) * ११०७ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंजनगाव सुर्जी (जि.अमरावती) येथील नगरपालिकेच्या विकास योजनेत बाजार समितीसाठी आरक्षित असलेल्या जमिनीचे अधिग्रहित करण्यास संचालकांनी नकार दिल्याने सदर जमीन विकासकाच्या ताब्यात जाणार असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), अमरावती यांनी दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी जमिनीचे पैसे भरण्याचे आदेश बाजार समितीला दिले असून संचालकाने विकासकाबरोबर असलेल्या संगनमतामुळे उक्त जागा विकत घेण्यास नकार दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन बाजार समितीच्या संचालकांविरुध्द कारवाई करुन सदर कोट्यवधीची जमीन शासन जमा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) हे खरे नाही, परंतु जिल्हाधिकारी, अमरावती यांचे सदर जमीन भूसंपादनाकरीता जमिनीच्या मुल्यांकनानुसार रुपये २.४० कोटी एवढी रक्कम भरणा करण्याबाबतचे पत्र कृषी उत्पन्न बाजार समिती अंजनगाव सुर्जी यांना दिनांक १२/०६/२०१९ रोजी

प्राप्त झाले असता, बाजार समितीने सदर जागा भुसंपादन करण्याकरीता एकूण रुपये १,२९,८८,५१६/- एवढी रक्कम भरणा केलेला असून सद्य:स्थितीत बाजार समितीकडे निधीचा अभाव असल्याने उर्वरित रक्कम भरण्याबाबत संचालक मंडळाने दिनांक २७/१२/२०१९ रोजी बहुमताने ठराव क्र. १३ पारीत करुन असमर्थ असल्याचे जिल्हाधिकारी, अमरावती यांना कळविले आहे.

(३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, अंजनगाव सुर्जी यांना सदर प्रकरणी चौकशी करण्याकरीता प्राधिकृत केलेले असून, सद्य:स्थितीत चौकशी सुरु आहे.

तसेच बाजार समिती संचालक मंडळ सभा दिनांक २७/१२/२०१९ ठराव क्र. १३ विरुध्द विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांचेसमोर दाखल रिव्हीजन अर्जावर दिनांक ०४/०२/२०२० रोजीच्या आदेशानुसार ठराव क्र.१३ ला अंतरिम स्थगिती दिलेली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्यांनी केलेल्या आत्महत्या

**(१८) * ४११ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.सुधीर तांबे, आर्कि.अनंत गाडगीळ, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामदास कदम :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात माहे ऑक्टोबर, २०१४ ते ऑगस्ट, २०१९ या पाच वर्षांच्या कालावधीत कर्जबाजारीपणा व गरीबीमुळे सुमारे १४,४७४ शेतकऱ्यांनी तसेच माहे नोव्हेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान अवकाळी पावसामुळे ३०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकरी आत्महत्या रोखणे, त्यांचे जीवनमान उंचावणे यासाठी सन २०१६-२०१७ मध्ये राबविण्यात आलेल्या योजनामध्ये रुपये ९ कोटी ८८ लाखांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे जून, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील १० वर्षात १० हजार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून भविष्यात शेतकरी आत्महत्या करणार नाहीत यासाठी विविध शेतीविषयक तज्ञांनी दिलेल्या अहवालांची अंमलबजावणी होत नसुन शेतकरी आत्महत्या रोखण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, नैसर्गिक आपत्ती/अवकाळी येणाऱ्या परिस्थितींचा शेतकऱ्यांना सामना करता यावा याकरीता शासनातर्फे भविष्यात काही प्रयोजन अथवा योजना तयार करण्यात आल्या आहेत काय,
(५) असल्यास, शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनामध्ये झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) होय, हे खरे आहे.

माहे ऑक्टोबर, २०१४ ते ऑगस्ट, २०१९ या कालावधीत एकूण १४,५९१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यापैकी ८,९४७ आत्महत्येची प्रकरणे पात्र असून ५,४३० प्रकरणे अपात्र आहेत. एकूण २१४ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

नोव्हेंबर, २०१९ मध्ये ३०८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून त्यापैकी १४९ आत्महत्येची प्रकरणे पात्र असून ४४ प्रकरणे अपात्र आहेत. ११५ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी प्रामुख्याने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत :-

i) शेती पिकांसाठी पर्याप्त सुविधा उपलब्ध होण्यासाठी विदर्भातील आत्महत्येचे प्रमाण जास्त असलेल्या ६ जिल्ह्यांकरीता विशेष पॅकेज.
ii) शेतकऱ्यांना समुपदेशनाची व प्रबोधनाची आवश्यकता विचारात घेऊन विविध उपाययोजना.
iii) विशेष मदतीच्या कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांच्या विकासासाठी “कृषी समृध्दी” योजनेच्या अनुषंगाने विविध विभागांकडून उपाययोजना.

iv) पथदर्शी प्रकल्प म्हणून विशेष मदतीचा कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने यवतमाळ व उस्मानाबाद जिल्ह्यात बळीराजा चेतना अभियान राबविणे.

v) शेतकऱ्यांना अन्न सुरक्षा, आरोग्य सेवा, शेती विकासाचे कार्यक्रम राबविणे व त्यांच्या मुलांना शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे अशा उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यासाठी कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनची पुनर्रचना करण्यात आली आहे.

(४) उक्त योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याचे प्रयोजन आहे.

(५) व (६) गैरव्यवहार झाला नसल्याने प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## जात पडताळणी समित्या आर्थिक दंडाची रक्कम शासकीय तिजोरीतून भरत असल्याबाबत

**(१९) * ८८६ श्री.सुरेश धस :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मा.सर्वोच्च न्यायालयाने माधुरी पाटील प्रकरणी दिलेल्या आदेशान्वये राज्यात अर्धन्यायिक अधिकार असलेल्या आदिवासी विभागाच्या जात पडताळणी समित्या जात पडताळणी अधिनियम कलम ७(२) चा गैरवापर करुन राजकीय दबावाखाली निर्णय होत असल्याने आतापर्यंत चुकीच्या निर्णयामुळे मा.उच्च न्यायालयाने अनेक प्रकरणी जात पडताळणी समित्यांना मोठ्या प्रमाणावर आर्थिक दंड केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमेदवारांचा दावा योग्य असतानाही जात पडताळणी समितीने दिलेल्या चुकीच्या निर्णयामुळे मा.उच्च न्यायालयाने केलेला दंड वैयक्तिक भरण्याऐवजी आयुक्त, जात पडताळणी समिती, पुणे यांनी शासकीय तिजोरीतून भरण्यास परवानगी दिलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वारंवार मा.उच्च न्यायालयाकडून जात पडताळणी समित्यांना त्यांनी दिलेल्या जात वैधतेच्या चुकीच्या निर्णयामुळे होणारे दंड व ते शासकीय तिजोरीतून भरावयास परवानगी देणारे आयुक्त, जात पडताळणी समिती, पुणे यांच्यावर तसेच त्यांनी अशी परवानगी देवू नये म्हणून शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१), (२) व (३) मा.उच्च न्यायालयाने काही जात पडताळणी प्रकरणांमध्ये अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती सदस्यांना आर्थिक दंड केलेला आहे.

अधिनियम २००० च्या कलम ७(२) नुसार पडताळणी समितीने दिलेला आदेश अंतिम असेल आणि याविरुध्द केवळ उच्च न्यायालयात दाद मागता येते. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समित्यांमार्फत मा.सर्वोच्च न्यायालयाने माधुरी पाटील प्रकरणी दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार अनुसूचित जमातीचा प्रत्येक दावा पडताळणी प्रकरणी स्वतंत्रपणे गुणवत्तेनुसार निर्णय घेण्यात येतात. त्यामुळे समित्यांमार्फत अधिनियम २००० च्या कलम ७(२) चा गैरवापर होत आहे अशी वस्तुस्थिती नाही.

अधिनियमातील कलम १६ नुसार समिती कार्यालयामध्ये काम करीत असलेल्या सदस्यांनी आदिवासींचे हित जोपासताना लोकसेवक या नात्याने सद्भावनेने केलेल्या कृतींना संरक्षण असल्याने आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे कार्यालयाने समिती सदस्यांना त्यांना ठोठावलेल्या दंडाच्या रक्कमेची प्रतीपूर्ती केली होती. तथापि, रिट याचिका क्र. ८१३९/२०१९ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक ६ ऑगस्ट, २०१९ रोजी पारित केलेल्या आदेशांच्या अनुषंगाने समिती सदस्यांना प्रतीपूर्ती करण्यात आलेल्या दंडाची रक्कम त्यांच्याकडून वसुल करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यात नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(२०) * २८२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.ख्वाजा बेग, श्री.किरण पावसकर, श्रीमती विद्या चव्हाण, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यात माहे ऑगस्ट ते सप्टेंबर, २०१९ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे ३० हजार शेतकऱ्यांचे सात हजार हेक्टर भात शेतीचे व फळ बागायतदारांचे नुकसान झाले असून प्रशासनाकडून नुकसान भरपाई मिळण्याबाबत 'समर्थन' या संस्थेने सचिव (मदत व पुनवर्सन विभाग), सचिव (कृषी विभाग) यांना दिनांक २६ सप्टेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पालघर जिल्ह्यात परतीच्या पावसाने ५० ते ६० गावांमधील पाच ते सात हजार हेक्टर क्षेत्रातील शेतीचे रुपये दोन ते अडीच कोटीचे नुकसान झाले तसेच जव्हार व मोखाडा (जि.पालघर) तालुक्यात माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतांच्या बांधांचे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तुटपुंजी मदत दिल्याने शेतजमिनीची तुटलेली बांध-बंदिस्ती दुरुस्त करण्यासाठी मोठ्या खर्चाची आवश्यकता असून हा खर्च अल्पभूधारक आदिवासी शेतकऱ्यांच्या आवाक्याबाहेर असल्याने पुढील हंगामात नुकसान झालेल्या शेतामधून भात कसा पिकवायचा अशी तक्रार शेतकऱ्यांनी मोखाडा तालुका कृषी अधिकारी यांचेकडे तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना निर्धारित मदत देण्याची मागणी शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, मा.मदत व पुनर्वसन मंत्री, जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पालघर जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) माहे ऑगस्ट ते सप्टेंबर, २०१९ या कालावधीत पालघर जिल्हयात झालेल्या अतिवृष्टीमुळे २७३८२ बिगर कर्जदार शेतकऱ्यांचे ६०५५.६४ हेक्टर क्षेत्रावरील शेती/फळपिकांचे नुकसान झाले असल्याचे दिसून आले आहे. त्याबाबत समर्थन या संस्थेने दिनांक २६ सप्टेंबर, २०१९ रोजीच्या पत्रान्वये सचिव, मदत व पुनर्वसन यांच्याकडे नुकसान भरपाई मिळण्यासंदर्भात लेखी पत्राद्वारे मागणी केली आहे.

(२) माहे ऑक्टोबर-नोव्हेंबर, २०१९ या कालावधीत पालघर जिल्हयात "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे झालेल्या परतीच्या पावसामुळे ११७१४८ शेतकऱ्यांचे ५२१९२.५४ हेक्टर क्षेत्रावरील शेती/फळपिकांचे नुकसान झाले असल्याचे दिसून आले आहे.

(३) पालघर जिल्हयात माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतीपिकांच्या नुकसानीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना शासन निर्णय, दिनांक १८/११/२०१९, दिनांक १३/१२/२०१९ अन्वये व शासन निर्णय, दिनांक ०१/०२/२०२० अन्वये एकूण रुपये ३८९५.६७ लक्ष एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे. त्यापैकी ८७४६८ शेतकऱ्यांना रुपये ३०.७८ कोटी इतका निधी वाटप करण्यात आला आहे.

माहे जुलै ते ऑक्टोबर, २०१९ मधील अतिवृष्टी व पुरबाधितांना द्यावयाच्या मदतीसाठी निधी मागणीचा प्रस्ताव प्राप्त झाला असून निधीच्या उपलब्धतेनुसार निधी वितरीत करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबईतील सहकारी संस्थांनी लेखापरिक्षण पूर्ण केले नसल्याबाबत

**(२१) * ३१३ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील २९ हजार सहकारी संस्थांपैकी १० हजार संस्थांनी लेखापरिक्षण केले नसल्याची बाब माहे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाच्या नियमानुसार लेखापरिक्षण करुन अहवाल माहे सप्टेंबरपर्यंत सहकार विभागाला सादर करणे बंधनकारक असतानाही मुदत संपुष्टात येऊनही संस्थांनी लेखापरिक्षण सादर केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लेखापरिक्षण न केलेल्या किती संस्थांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

सन २०१८-२०१९ या वर्षात लेखापरिक्षणासाठी मुंबईतील एकूण २९,८९४ सहकारी संस्था पात्र होत्या. त्यापैकी माहे जानेवारी, २०२० अखेर एकूण २२,१३२ संस्थांचे लेखापरिक्षण पूर्ण झाले असून, ७,७६२ संस्थांचे लेखापरिक्षकांना लेखापरिक्षण करण्यासाठी संस्थांकडून दप्तर उपलब्ध करुन न देणे, लेखापरिक्षण करण्यासाठी सहकार्य न करणे, संस्थांचे दप्तर अपूर्ण असणे, पत्ता न सापडणे इत्यादी कारणास्तव संस्थांचे लेखापरिक्षण झालेले नाही.

(३) संबंधित निबंधकांनी लेखापरिक्षण न झालेल्या मुंबईतील एकूण ७,७६२ संस्थांपैकी ६०८ संस्थांना कलम १०२ अन्वये अवसायनपूर्व नोटीस दिली असून, ३,१४३ संस्थांना लेखापरिक्षण करण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे. तसेच, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम ७५(५) अन्वये १,१८१ संस्थांची सुनावणी सुरु असून, उर्वरित संस्थांवर कायद्यातील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे. ज्या संस्था लेखापरिक्षणासाठी रेकॉर्ड उपलब्ध करुन देणार नाहीत, त्यांच्याविरुध्द अधिनियमातील ८०(१) अन्वये रेकॉर्ड जप्तीची कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

# यवतमाळमध्ये रमाई आवास योजनेंतर्गत घरकुलाची कामे स्थगित केल्याबाबत

**(२२) * ३५३ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रमाई आवास योजनेंतर्गत मागासवर्गीयांना घरकुले मंजूर करण्यात येतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गतवर्षी यवतमाळ नगरपरिषदेने तेथील मागासवर्गीयांना सदर योजनेंतर्गत घरकुल मंजूर करण्यात येवून प्राथमिकस्तरावरील कामाचे धनादेश देखील अदा करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित लाभार्थ्यांनी घरकुलांची कामे सुरु केल्यावर यवतमाळ नगरपरिषदेने सदर घरकुलाची कामे अतिक्रमण ठरवून रमाई आवास योजनेची कामे स्थगित केल्यामुळे संबंधित लाभार्थ्याचे संसार उघड्यावर पडले असल्याचे दिनांक ६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

(४) होय, सदर प्रकरणी मुख्याधिकारी, नगरपरिषद, यवतमाळ यांनी चौकशी केली असता, नेताजीनगर, यवतमाळ येथील ५ लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात आलेली जागा ही रेल्वे विभागाच्या अखत्यारितीत असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे घरकुलाची कामे स्थगित करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पांढरकवडा प्रकल्पातील शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकांच्या वेतनवाढीबाबत

**(२३) * ११२६ डॉ.रणजित पाटील :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पांढरकवडा प्रकल्पातील शासकीय आश्रमशाळेतील ४८ शिक्षकांच्या तीन सराव परीक्षा आयोजित करुन केवळ एकाच सराव परिक्षेच्या निकालावर सर्व माध्यमिक शिक्षकांच्या वेतनवाढी रोखण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिक्षकांनी अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्याकडे अपील करुन सहा महिन्यांचा कालावधी होऊनही सुनावणी झाली नसून पुर्वीच्या प्रकल्प अधिकाऱ्यांनी शिक्षकांबद्दल सकारात्मक अहवाल पाठवून सुध्दा पुनश्च शिक्षकांच्या मागील ५ वर्षाचे निकाल मागविणे आणि त्यांच्या परीक्षा घेणे यामध्ये वेळ वाया घालवणे सुरु आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पांढरकवडा प्रकल्पातील शासकीय आश्रमशाळेतील शिक्षकांच्या रोखलेल्या वेतनवाढीबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणी ४८ शिक्षकांना वैयक्तिक सुनावणी देऊन अपिले निकाली काढण्याची कार्यवाही अपर आयुक्त स्तरावर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दि परभणी पिपल्स को-ऑप. बँकेच्या मालमत्ता विक्रीत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२४) * ६७८ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी शहरातील शिवाजी महाराज पुतळयाजवळील ऐन मोक्यावर असणाऱ्या पिपल्स को-ऑप बँकेच्या मुख्य इमारतीचे बाजारमुल्य ७५ कोटीहून अधिक असताना जिल्हा उपनिबंधक यांनी खरेदीदाराच्या सोयीसाठी अटीमधील फेरफार व इतर गैरप्रकार करीत केवळ १३ कोटींना विक्री करून शासनाचे नुकसान व खरेदीदारास फायदा करून देण्याचा प्रकार केल्यावरून या प्रकरणी मंत्रालयस्तरावरून चौकशी करावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते परभणी यांनी सन २०२० मध्ये वा त्यादरम्यान सचिव, सहकार यांच्याकडे लेखी निवेदनाव्दारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाचा फायदा करण्यासाठी बाजारमुल्याप्रमाणे रक्कम मिळावी, तसेच जास्तीचे खरेदीदार उपलब्ध व्हावेत, तसेच स्पर्धा वाढावी यासाठी जाहीर प्रसिध्दी न करता व अटीमध्ये सोयीस्कररीत्या फेरफार करीत हितसंबंधास फायदा पोहचविण्यासाठी प्रकार केलेल्या जिल्हा उपनिबंधक यांच्या संशयास्पद कारभाराची चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषींविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) दि परभणी पिपल्स को-ऑप. बँकेच्या मालमत्ता लिलाव प्रक्रियेबाबत तक्रार प्राप्त झाली असून सदर तक्रारीमधील मुद्यांच्या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करणेबाबत सहकार आयुक्तांना कळविण्यात आले आहे.

(२) व (३) सहकार आयुक्तांनी परभणी पिपल्स को-ऑप. बँकेच्या स्थावर मालमत्तांच्या विक्रीस दिनांक ०८/०४/२०१९ च्या पत्रान्वये मान्यता दिली असून सदर मालमत्तेची वाजवी किंमत रुपये १०.६४ कोटी निर्धारित केली आहे. त्यानुषंगाने नियमानुसार ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असून प्राप्त निविदांपैकी रुपये १२.०६ कोटी इतक्या रकमेच्या सर्वोच्च निविदाधारकांस सदर मालमत्तेची विक्री करण्यास सहकार आयुक्तांनी दिनांक २१/०६/२०१९ रोजीच्या पत्रान्वये मान्यता दिली आहे.

वरील विक्री प्रक्रियेविरुध्द तक्रारदारांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे याचिका दाखल केलेल्या होत्या. सदर याचिका मा.उच्च न्यायालयाने फेटाळल्या असून सदर विक्री प्रक्रियेत अनियमितता झालेली नसल्याचे स्पष्ट केले आहे. तसेच या प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये विशेष अनुमती याचिका दाखल करण्यात आली होती. त्यानुषंगाने मा.सर्वोच्च न्यायालयाने अवसायकाच्या बाजूने निकाल दिलेला आहे. सदर न्यायनिर्णयाच्या अधिन राहून अवसायकाने पुढील कार्यवाही करण्याबाबत सहकार आयुक्तांनी दिनांक २८/११/२०१९ च्या पत्रान्वये कळविले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पूर्व विदर्भातील शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीबाबत

**(२५) * ३९७ श्री.रामदास आंबटकर, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: पूर्व विदर्भातील चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली जिल्हयात रानटी डुकराकडून शेतकऱ्यांच्या धान, सोयाबीन, तुर, हरबरा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे दिनांक १२ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रानटी डुकराकडून होणाऱ्या पिकांच्या नुकसानाची भरपाई देऊन सदर डुकरांचा बंदोबस्त करण्यासाठी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) व (२) पूर्व विदर्भातील नागपूर, चंद्रपूर व गडचिरोली (प्रादेशिक) वनवृत्त तसेच वन्यजीव, पूर्व नागपूर वनवृत्तात दिनांक ०१ एप्रिल, २०१९ ते ३१ डिसेंबर, २०१९ पर्यंत एकूण २३८६१ पीक नुकसानीची प्रकरणे निदर्शनास आली असून सदर प्रकरणांमध्ये प्रचलित शासन निर्णयानुसार एकूण रक्कम रुपये १५४९.७२ लक्ष नुकसान भरपाई संबंधितांना अदा करण्यात आली आहे.

शासन निर्णय, दिनांक २२ जुलै, २०१५ अन्वये शेतपिकास नुकसान करणारे रोही/रानडुक्कर यांना पारध करण्यासाठी प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यात आलेली आहे. तसेच पारध करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करण्याकरीता परवाने जारी करण्याचे अधिकार वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आलेले आहे. शेतकऱ्यांकडून मागणी केल्यास रानडुक्करांना पारध करण्यासाठी तात्काळ परवाने जारी करण्यात येतात.

मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वन्यप्राणी वनक्षेत्राच्या बाहेर येवू नये म्हणून वनक्षेत्रात त्यांना पिण्याकरीता पानवठे तयार करण्यात आलेले असून जलसंधारण व मृद संधारणाची कामे हाती घेण्यात येतात. वनक्षेत्रात चारा उपलब्ध व्हावा म्हणून विविध योजनेंतर्गत गवत रोपवन व मिश्र रोपवन घेण्यात येते. तसेच उपलब्ध बारमाही व हंगामी पाणस्थळावर नियमितपणे गस्त वाढवुन त्यामध्ये सुध्दा पाणी जास्त काळ उपलब्ध राहील याबाबत काळजी घेण्यात येते.
- अशासकीय संस्थाद्वारे गावामध्ये प्रशिक्षण घेऊन मानव वन्यजीव संघर्ष टाळण्याच्या अनुषंगाने गावकरी व क्षेत्रिय कर्मचाऱ्यांना मानव वन्यजीव संघर्षाची कारणे, संघर्ष टाळणेसाठी तसेच संघर्षाचे वेळेस करावयाची वर्तणूक याबाबत प्रशिक्षण देण्यात येते.
- वन्यप्राण्यांपासून बचाव करणेसाठी ग्रामस्थांना/शेतकऱ्यांना ग्रामसभा भेटीद्वारे, भिंतीपत्रकाद्वारे माहिती देण्यात येते तसेच विशेष प्रकरणी दवंडी, प्रत्यक्ष ग्रामस्थांशी चर्चा, निसर्ग संवर्धन प्रशिक्षणाद्वारे माहिती पुरविली जाते.
- वन विभागात मानव वन्यप्राणी सघंर्ष रोखण्याकरीता जलद बचाव गट गठीत करण्यात आलेली असून त्यांना सर्व साहित्यासह वाहन उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. सदर चमुव्दारे वनक्षेत्रात सतत गस्ती करुन मानव-वन्यप्राणी संघर्ष रोखण्याचे कार्य करण्यात येत आहे.

- डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन योजनेंतर्गत वनालगत असणाऱ्या गावातील जनतेला एल.पी.जी., कुंपण, शौचालय बांधकाम इत्यादी सुविधा पुरविण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विदर्भातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गावांचे तथा पेढी प्रकल्पाच्या पुनर्वसनाबाबत

**(२६) * १५७८ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील गावांचे तथा पेढी प्रकल्पाच्या पुनर्वसनाचे काम मागील पाच वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या पुनर्वसनाचे काम प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत तसेच यासदंर्भात आदिवासी बांधवानी अकोल्यातील जिल्हाधिकारी कार्यालयात सन २०१९ मध्ये वा त्यादरम्यान मोर्चा काढला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकल्पाच्या पुनर्वसनाबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) हे खरे नाही. मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत अमरावती जिल्हयातील १८ बाधित गावांतील कुटुबांचे स्वेच्छेने पुनर्वसन केले असून ७ गावांची पुनर्वसनाची प्रक्रिया प्रगथीपथावार आहे व ८ बाधित गावांचे पुनर्वसन टप्प्या-टप्प्याने करण्याची प्रक्रिया सुरु आहे. निम्न पेढी प्रकल्पांतर्गत पाच गावे पूर्णत: व दोन गावे अंशत: पुनर्वसित करणे आवश्यक आहे. पाच पूर्णत: बाधित गावातील ९० टक्के नागरी सुविधांची कामे पूर्ण झाली आहेत. प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसित गावाठाणांमध्ये स्थलांतरीत होण्याच्यादृष्टीने घरांचे बांधकाम सुरु केले आहे.

(२) व (३) निम्न पेढी प्रकल्पांतर्गत पुनर्वसनाची कामे प्रगतीपथावर आहेत. तथापि, निम्न पेढी प्रकल्पांतर्गत काही भुधारकांनी घरांचा निवाडा रद्द करण्याबाबत दाखल केलेल्या रिट याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २४/०७/२०१८ च्या आदेशान्वये प्रकल्पग्रस्तांच्या स्थलांतरणास स्थगिती दिली आहे. प्रकल्पाला व पुनर्वसनाला प्रकल्पग्रस्तांचा असलेल्या तीव्र विरोधामुळे पुनर्वसन प्रक्रियेला अडथळा येत आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत बाधित आदिवासींच्या मागणीबाबत दिनांक ७/१२/२०१८ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे पायदळ मार्गाने मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे. यानुषंगाने अकोला जिल्ह्यातील पुनर्वसित गावाठाणांमध्ये पायाभूत व नागरी सुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने दिनांक ०२/०२/२०१९ रोजी जिल्हाधिकारी, अकोला यांनी तातडीची बैठक आयोजित करून ग्रामस्थांना रोजगार विषयक प्रशिक्षण व साहित्य वितरण, शाळा, अंगणवाडी ग्रामपंचायत इमारत, पाणीपुरवठा, अंतर्गत रस्ते व पोहोच रस्ते, आरोग्य विषयक सुविधा पुरविण्याबाबत निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. पुनर्वसन प्रक्रिया त्वरीत पूर्ण करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

(४) विलंब झालेला नाही.

-----------------

## सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात अतिवृष्टीबाधित पूरग्रस्तांना मदत देण्याबाबत

**(२७) * १५९९ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.वजाहत मिर्झा, डॉ.सुधीर तांबे, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.अमरनाथ राजूरकर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१९ मध्ये अतिवृष्टीमुळे कोल्हापूर व सांगली येथील धरणांमधून मोठ्या प्रमाणात करण्यात आलेल्या पाण्याच्या विसर्गामुळे ३८२ जणांचा बळी गेला असून आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूरग्रस्त भागातील परिस्थितीचा आढावा घेऊन पाऊस आणि पुरामुळे बळी गेलेल्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत तसेच बाधित झालेल्या पुरग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) अंशत: खरे आहे.

जुलै-ऑगस्ट, २०१९ मधील अतिवृष्टी व पुरामुळे सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात एकूण ४१ व्यक्तींचा बळी गेलेला आहे.
(२) सांगली व कोल्हापूर जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे बळी गेलेल्या एकूण ४१ व्यक्तींपैकी ३५ व्यक्तींच्या कुटुंबियांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी (NDRF), मुख्यमंत्री सहाय्यता निधी व पंतप्रधान सहाय्यता निधीमधून रूपये २.०५ कोटी रूपयांची आर्थिक मदत देण्यात आली आहे. उर्वरित ६ मृत व्यक्तींपैकी एका मृत व्यक्तीची ओळख न पटल्याने, २ व्यक्तींच्या वारसांची तपासणी ठरलेली नसल्याने व तीन व्यक्तींचे शवविच्छेदन झालेले नसल्याने मदतीचे वाटप करण्यात आलेले नाही.

त्याचप्रमाणे पूरग्रस्त भागातील बाधित पुरग्रस्तांना मदत देण्यासंदर्भात दिनांक ३०/७/२०१९ व ७/८/२०१९ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत विशेष दराने मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला, त्यानुषंगाने दिनांक ०८/०८/२०१९, दिनांक २९/०८/२०१९, दिनांक ११/०९/२०१९ रोजी मदतीबाबत शासन निर्णय पारित करण्यात आलेले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) आदिवासी प्रकल्पांतर्गत आश्रमशाळांना सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत

**(२८) * १७८० श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, डॉ.परिणय फुके, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.सुजितसिंह ठाकूर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात ठाणे जिल्ह्यातील शहापूर आदिवासी विकास प्रकल्पाच्या बहुतांश आश्रमशाळातील गरीब आदिवासी मुला-मुलींना प्रचंड असुविधांना सामोरे जावे लागत असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१९ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी विकास प्रकल्पाच्या कित्येक शाळांमध्ये मुख्याध्यापकांच्या रिक्त जागांवर सहशिक्षकांनाच प्रभारी मुख्याध्यापकांचा कारभार सोपविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुख्याध्यापकांची पदे भरण्याचा अधिकार आदिवासी अप्पर आयुक्तांना असतानाही पदे न भरण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) शहापूर प्रकल्पामधील २३ आश्रमशाळांपैकी १६ आश्रमशाळांना पक्क्या इमारती आहेत, २ आश्रमशाळा जलसंपदा विभागाच्या शेडमध्ये आहेत. तसेच ५ आश्रमशाळा भाड्याच्या इमारतीत कार्यरत आहेत. सर्व आश्रमशाळांमध्ये पिण्याचे पाणी, वीज, शौचालय, स्नानगृह, मुलींची स्वतंत्र वसतिगृह, रस्ते व संरक्षण भिंत अशा सुविधा आहेत. सर्व आश्रमशाळांना बेंचेस, बेड, डायनिंग टेबल, खुर्ची, कपाट इ. फर्निचर पुरवठा केलेला आहे. तसेच उर्वी पिरामल फाऊंडेशनमार्फत नियमित आरोग्य तपासणी केली जाते.
(२), (३), (४) व (५) प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, शहापूर अंतर्गत एकूण २३ शासकीय आश्रमशाळा कार्यरत असून माध्यमिक मुख्याध्यापकांची एकूण २० पदे मंजूर आहेत. त्यापैकी १३ ठिकाणी नियमित मुख्याध्यापक कार्यरत असून उर्वरित ७ ठिकाणी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून माध्यमिक शिक्षक व पदवीधर शिक्षक यांच्याकडे प्रभारी मुख्याध्यापक म्हणून अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

माध्यमिक शिक्षक संवर्गाची अंतिम सेवा जेष्ठता यादी प्रसिध्द करण्याची व पदोन्नतीने माध्यमिक मुख्याध्यापक पदे भरण्याची अपर आयुक्त आदिवासी विकास, ठाणे यांचेमार्फत कार्यवाही सुरू आहे. मुख्याध्यापकांच्या पदोन्नतीची कार्यवाही तातडीने करण्याच्या सूचना अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे यांना देण्यात आल्या आहेत.

-----------------

## राज्यातील अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळण्याबाबत

**(२९) * १७९८ श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अतिवृष्टीने बाधित झालेल्या राज्यातील १ कोटी ३ लाख शेतकऱ्यांसाठी रुपये साडेसहा हजार कोटी वितरीत केले असून मदतीची सर्व रक्कम संबंधित शेतकऱ्यांना वितरीत केल्याचा तहसिलदारांचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांमार्फत शासनास पाठविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्षात सुमारे १३ लाख ७० हजार शेतकऱ्यांची रुपये १ हजार २१४ कोटींची रक्कम तहसिलदारांच्या खात्यावर जमा असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकरी अतिवृष्टीमुळे अडचणीत असताना लाखो शेतकऱ्यांची कोट्यवधी रुपयांची रक्कम ज्या तहसिलदारांनी त्यांच्या खात्यावर प्रलंबित ठेवली आहे अशा तहसिलदारांची चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित तहसिलदारांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) होय.

(२) अवेळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान झालेल्या राज्यातील १ कोटी ६ लाख बाधित शेतकऱ्यांना दिनांक १८/११/२०१९ रोजी रुपये २०५९३६.६५ लाख, दिनांक १३/१२/२०१९ रोजी रुपये ४५००००.०० लाख आणि ०१/०२/२०२० रोजी ७५०००.०० लाख अशा प्रकारे तीन हप्त्यात रुपये ७३०९३६.६५ लाख निधीचे

वितरण करण्यात आले आहे. त्यापैकी ६६९०८२.२४ लाख निधीचे वाटप ९३.८६ लाख शेतकऱ्यांना बँकामार्फत करण्यात आलेले आहे. उर्वरित निधी वाटपाचे काम सुरू आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात रंगवैखरी महाविद्‌यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत

**(३०) * १९१५ श्री.महादेव जानकर, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.अरुणकाका जगताप, श्री.निलय नाईक :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मराठी विकास संस्थेकडून मागील दोन वर्षापासून महाराष्ट्राच्या संस्कृतीसाठी “रंगवैखरी” या राज्यस्तरीय आंतरमहाविद्‌यालयीन कलाविष्कार स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त स्पर्धेच्या आयोजन आणि खर्चासाठी वित्त व प्रकल्प समितीने दोन वर्षापूर्वीच मान्यता दिल्याने त्यासाठी संस्थेच्या अर्थसंकल्पात रुपये ४० लाखांची तरतूद केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर स्पर्धा तीन वर्षासाठी सुरु ठेवण्यास मान्यता देण्यात आली असून तिसऱ्या वर्षी होणाऱ्या स्पर्धेस राज्य मराठी विकास संस्थेचे तत्कालीन प्रभारी संचालक प्रा.डॉ.काटीकर आणि रंगवैखरी प्रकल्प प्रमुख श्री.गिरीश पतके यांनी स्थगिती दिल्याचे दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, तत्कालीन मराठी भाषा विभागाच्या मा.मंत्र्यांच्या आदेशाचे तसेच शासकीय नियमांचे उल्लंघन करुन स्पर्धेच्या पर्व तीनची फेरी आयोजित केल्याचे कारण देऊन पर्व तीनच्या फेरीस विद्‌यमान संचालक यांनी स्थगिती दिली, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर स्पर्धेच्या पर्व तीनच्या फेरीस विद्यमान मा.मराठी भाषा मंत्री महोदयांची पुन्हा मान्यता घेवून रंगवैखरी महाविद्यालयीन स्पर्धेचे आयोजन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, त्याचे थोडक्यात स्वरुप व त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

**श्री.सुभाष देसाई :** (१) होय.

(२), (३) आणि (४) तत्वत: खरे आहे.

राज्य मराठी विकास संस्थेचे सर्व प्रस्ताव/उपक्रमांना प्रकल्प वित्त समितीची मान्यता घेऊन कार्यकारी समितीसमोर सादर करण्याची राज्य मराठी विकास संस्थेच्या घटनेनुसार तरतूद आहे. त्यानुसार प्रस्ताव सादर करण्याच्या तत्कालीन मा.मंत्री (मराठी भाषा) यांच्या सूचना असतानाही विहित कार्यपध्दतीनुसार प्रस्ताव प्रकल्प वित्त समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्यात आलेले नाही. ही बाब निदर्शनास आल्याने तत्कालीन संचालक (श्रीमती मिनाक्षी पाटील) राज्य मराठी विकास संस्था यांनी सदर स्पर्धेच्या आयोजनाला स्थगिती दिली आहे.

(५) याबाबत शासनाने दिनांक २८/०१/२०२० च्या पत्रान्वये रंगवैखरी हा महाविद्यालयीन स्पर्धेचा उपक्रम यापुढेही चालू ठेवण्याच्या किंबहुना आवश्यक असल्यास त्यात अधिक व्यापकता कशी येईल यादृष्टीने संस्थेने विहित प्रस्ताव कार्यकारी समितीच्या मान्यतेस्तव सादर करावा असे स्पष्ट निर्देश संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांना दिले आहेत.

-----------------

## नागपूर येथील मिरची व सोयाबीन पिकांची भाववाढ रोखण्याबाबत

**(३१) * २११६ श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परतीच्या पावसामुळे मिरचीच्या पिकांचे नुकसान झाल्याने राज्यात आंध्रप्रदेशातून मिरची मागविल्या जात असून मिरचीची मागणी वाढल्यामुळे भाव दर्जानुसार रुपये १५० ते २०० पर्यंत गेले आहेत, आवक कमी असल्यामुळे मिरचीचे भाव रुपये ५० ते ६० ने वाढले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परतीच्या पावसामुळे सोयाबीनची आवक कमी झाली आहे, नागपूरच्या कळमना बाजारात दररोज १५०० ते २००० सोयाबीन पोत्यांची आवक असायची मात्र आता फक्त ४०० ते ५०० पोत्यांपर्यंत इतकी कमी झाली आहे, तर सोयाबीनचा भाव रुपये १५० ते २०० ने वाढून रुपये ४३५० पर्यंत गेला आहे, बाजारात सोयाबीन तेलाचे भाव रुपये १०४ पर्यंत गेले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नागपूर येथील मिरची व सोयाबीन पिकांची दरवाढ रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय.

नागपूर जिल्ह्यातील १३ कृषी उत्पन्न बाजार समितीपैकी नागपूर, भिवापूर व मांढळ या तीन बाजार समित्यांमध्ये मिरच्यांची आवक होते. त्यापैकी भिवापूर व मांढळ येथे आंध्रप्रदेशातून मिरची येत नाही. कृषी उत्पन्न बाजार समिती, नागपूर येथे आंध्रप्रदेशातून मिरची येते. सन २०१८-२०१९ व सन २०१९-२०२० या वर्षातील ऑगस्ट ते जानेवारी यादरम्यान मिरचीची आवक व मिरचीला मिळणारा भाव लक्षात घेता सन २०१९-२०२० मध्ये आवक घटल्याचे व किंमतीमध्ये वाढ झाली आहे.

| माहे | आवक | कमीत कमी | जास्तीत जास्त | माहे | आवक | कमीत कमी | जास्तीत जास्त |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑगस्ट २०१८ | १०१६७ क्वि. | ६००० | ६६४३ | ऑगस्ट २०१९ | २९३० क्वि. | ७४०४ | १०४०४ |
| सप्टें २०१८ | १५५७२ क्वि. | ६००० | ६७०० | सप्टें २०१९ | २४४९ क्वि. | ७७१७ | १०६५७ |
| ऑक्टो २०१८ | १९४८९ क्वि. | ६००० | ७००० | ऑक्टो २०१९ | १२१९ क्वि. | ७००० | १०००० |
| नोव्हे २०१८ | २३६७३ क्वि. | ६००० | ७००० | नोव्हें २०१९ | १४२४६ क्वि. | ९५७१ | १२५५२ |
| डिसें २०१८ | ३१०२८ क्वि. | ६२०० | ८१४२ | डिसें २०१९ | १७४७४ क्वि. | १०००० | १३००० |
| जाने २०१९ | ३२४५७ क्वि. | ६००० | ८००० | जाने २०२० | १८१७६ क्वि. | ११६२८ | १४०८५ |

(२) अंशत: खरे आहे.

नागपूर जिल्ह्यातील १३ कृषी उत्पन्न बाजार समितीपैकी रामटेक, कामठी, हिंगणा, नरखेड या समिती वगळता इतर बाजार समितीमध्ये सोयाबीनची आवक होत नाही. माहे ऑक्टोबर, २०१८ च्या तुलनेत माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये सोयाबीनची आवक कमी झाल्याची दिसून येते. त्यानुसार मिळणाऱ्या भावाची तुलना केल्यास सन २०१८-२०१९ च्या तुलनेत २०१९-२०२० चे भाववाढ झाल्याचे निर्दशनास येते.

| माहे | आवक | कमीत कमी | जास्तीत जास्त | माहे | आवक | कमीत कमी | जास्तीत जास्त |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ऑक्टो २०१८ | १०४१३८ क्वि. | २६५९ | ३०७८ | ऑक्टो २०१९ | ५०९०७ क्वि. | ३०६० | ३५६२ |
| नोव्हे २०१८ | ३४७१८ क्वि. | २९९४ | ३३४६ | नोव्हे २०१९ | ११०९४२ क्वि. | ३०७९ | ३७८९ |
| डिसें २०१८ | १७९९५ क्वि. | ३००० | ३२७३ | डिसें २०१९ | ३५८१६ क्वि. | ३५९५ | ४११६ |
| जाने २०१९ | २६१६८ क्वि. | ३२६८ | ३५७८ | जाने २०२० | ११५०९ क्वि. | ३७१४ | ४१५२ |

(३) कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये विक्रीसाठी आलेल्या कृषी मालाची उघड लिलावाद्वारे विक्री केली जाते. त्यामुळे संबंधित कृषी मालाची बाजारातील मागणी व त्याचा पुरवठा यावर, त्या कृषीमालास दर मिळतात. ऑगस्ट, २०१९ ते डिसेंबर, २०१९ या कालावधीत राज्यात सुरूवातीला लांबलेला पाऊस व नंतर अवकाळी पावसामुळे शेतमालाचे नुकसान झाल्यामुळे दर वाढले होते. मात्र, आता शेतमालाच्या पुरवठ्यात काही अंशी वाढ झाल्यामुळे माफक दर प्राप्त होत आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याबाबत

**(३२) * ५४८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, ॲड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कंधाणे, सायने व नांदगांव (ता.मालेगाव, जि.नाशिक) येथे एकाच दिवशी तीन शेतकऱ्यांनी नापिकी, कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या केल्याचे दिनांक १९ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन तीनही शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) होय, हे खरे आहे.

मौजे कंधाणे व सायने (ता.मालेगाव) येथील प्रत्येकी १ शेतकऱ्याने व नांदगांव (ता.मालेगाव) येथील १ शेतकऱ्याने अशा एकूण ३ शेतकऱ्यांनी अनुक्रमे दिनांक १७/०१/२०१९ व दिनांक १८/०१/२०१९ रोजी आत्महत्या केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) जिल्हास्तरीय समितीने शासनाच्या निकषानुसार १ प्रकरण मदतीस पात्र ठरविले असून, २ प्रकरणे अपात्र ठरविली आहेत. पात्र प्रकरणात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसास आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे कोटंबा व इटाळा (ता.सेलू, जि.वर्धा) येथील रोपवनाचे नुकसान झाल्याबाबत

**(३३) * ३२९ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे कोटंबा व इटाळा (ता.सेलू, जि.वर्धा) येथे सामाजिक वनीकरण विभागाने शासकीय व झुडपी जंगल जमिनीवर रोपवनाची निर्मिती केली असता ॲफकॉन्सच्या उपकंत्राटदारांनी शेकडो एकर जमिनीतून मुरुम व माती चोरी केल्याने सदर रोपांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ॲफकॉन्स उपकंत्राटदाराविरुध्द सामाजिक वनीकरण विभागाने संबंधित पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अवैधरित्या शेकडो एकर जमिनीवरील मुरुम व माती उत्खननाची परवानगी व जिल्हाधिकारी, वर्धा यांना सदर प्रकरणाची सामाजिक वनीकरण विभागाने माहिती दिली होती, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी संबंधित कंत्राटदार व उपकंत्राटदाराविरुध्द जिल्हाधिकारी, वर्धा यांनी कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) मौजे कोटंबा व मौजे इटाळा ता.सेलू, जि.वर्धा येथील अनुक्रमे सर्व्हे नं.२१० व ७ या जमिनीतून ॲफकॉन्सच्या उपकंत्राटदारांनी अनधिकृतपणे माती चोरी केल्याने सदर जमिनीवरील रोपवनांचे नुकसान झाल्याची बातमी दिनांक ०१/१२/२०१९ रोजी दै. लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे.
(२), (३) व (४) प्रश्नाधीन क्षेत्र हे महसूली क्षेत्र असून संबंधित ग्रामपंचायतीच्या ताब्यात आहे. सदर जागेवरील रोपवन कालावधी सन १९९१-१९९२ मध्ये पूर्ण झाल्याने वन विभागाकडून ग्रामपंचायतीस हस्तांतरीत करण्यात आले आहे. वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने चौकशी करुन आवश्यक कार्यवाही करण्याबाबत विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण, वर्धा यांनी तहसिलदार सेलू यांना कळविले आहे. या प्रकरणी महसूली यंत्रणेमार्फत संपूर्ण उत्खनन क्षेत्राची ई.टी.एस.द्वारे मोजणी करण्यात आली आहे. मोजणी अहवालानुसार सदरचे उत्खनन परवानगी प्राप्त सर्व्हे क्रमांकाचे क्षेत्राबाहेरील आहे किंवा कसे याबाबत शहानिशा करण्याबाबत उपअधीक्षक, भुमि अभिलेख सेलू यांचा अहवाल मागविला असून अहवाल प्राप्त झाल्यानंतर तहसिलदार, सेलू यांच्यामार्फत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सिंधुदुर्ग जिल्ह्यासह शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याबाबत

**(३४) * १४३२ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.नागोराव गाणार, डॉ.परिणय फुके, श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यात नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या मोठी असून हजारो कर्जदारांनी आपल्या कर्जाची नियमित परतफेड केली आहे तसेच अनेक शेतकऱ्यांनी दागिणे गहाण ठेवून कर्जाचे व्याज भरून कर्ज नियमित करून घेतले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने घोषित केलेल्या कर्जमाफीत नियमित कर्जदारांना वगळल्यामुळे नियमित कर्ज भरणाऱ्यांवर अन्याय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, नियमित कर्जदारांना सरसकट कर्जमाफी द्यावी अशी मागणी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील विशेषत: सिंधुदुर्ग जिल्ह्यासह नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) नाही.

(२) नाही.

(३) होय.

(४) शासनाने दिनांक १५/०१/२०२० च्या शासन निर्णयान्वये अल्पमुदत पीक कर्ज व अल्पमुदत पीक कर्जाचे केलेले पुनर्गठीत/फेर पुनर्गठीत कर्ज यांची रुपये २.०० लाखापेक्षा जास्त थकबाकीची रक्कम असलेल्या खातेदारांना तसेच अल्पमुदतीच्या पीक कर्जाची नियमितपणे परतफेड करणाऱ्या खातेदारांना योग्य समर्पक योजनेद्वारे दिलासा देण्यासंदर्भात अभ्यास करुन शिफारशी करण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत केली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर महाऔष्णिक केंद्राच्या वॉटर एटीएम यंत्रणेत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(३५) * १० श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.अरुणकाका जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील महाऔष्णिक केंद्राच्या विस्तारीत प्रकल्पांतर्गत चंद्रपूर शहरालगतच्या १०१ व चंद्रपूर परिसरातील ५१ गावासाठी मागील वर्षापासून वॉटर एटीएम यंत्रणा बसविण्यात येत असल्याचे दिनांक १८ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याकरीता ६ कंत्राटदारांनी निविदा भरल्या असताना ते काम राईट वॉटर सोल्यूशन प्रा.लि.नागपूर या कंपनीस देण्यात आले असून त्यासाठी पहिली निविदा दिनांक २५ जून, २०१८ रोजी रक्कम रुपये ५ कोटी ६ लाख ८० हजारांची काढण्यात येऊन दुसऱ्या टप्प्यातील कामासाठी निविदा न मागविताच रक्कम रुपये ५ कोटी २९ लाख इतक्या किंमतीचे काम पुन्हा त्याच कंपनीला देण्यात आल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कंपनीमार्फत बसविण्यात आलेल्या वॉटर एटीएम मशिन्सपैकी निम्म्यापेक्षा जास्त वॉटर एटीएम मशिन्स सध्या बंद असल्याच्या तक्रारी संबंधित गावकऱ्यांनी शासनाकडे केल्या असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत तसेच चंद्रपूर जिल्हा परिषदेमार्फत त्याच क्षेत्रातील अनेक गावांमध्ये त्याच पध्दतीची वॉटर एटीएम यंत्रणा बसविली असून एका वॉटर एटीएम मशिन्सची किंमत रुपये ७ लाख असताना, बांधकाम विभागाने हे कंत्राट राईट वॉटर सोल्यूशन कंपनीला प्रति वॉटर एटीएमसाठी रुपये १० लाख ३६ हजार इतक्या रक्कमेस दिल्याने त्यामध्ये करोडो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१९ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) चंद्रपूर महाऔष्णिक केंद्राच्या विस्तारीत प्रकल्पांतर्गत महानिर्मिती कंपनीने पहिल्या टप्प्यात एकूण ५० वॉटर एटीएमची कामे पूर्ण झाली आहेत. तसेच दुसऱ्या टप्यातील ५१ ठिकाणी वॉटर एटीएम कामास मान्यता देण्यात आली असून त्यापैकी १६ वॉटर एटीएम उभारणीची कामे सुरु आहे.
(२) पहिल्या टप्प्यातील ५० वॉटर एटीएमच्या कामाची किंमत रुपये ४,२९,४९,५००.०० तर दुसऱ्या टप्यातील ५१ वॉटर एटीएमच्या कामाची किंमत रुपये ४,६४,८८,२५०.०० इतकी आहे. सदर कामांकरीता जाहीर निविदा वर्तमान पत्रात प्रकाशित करुन खुल्या निविदेव्दारे न्यूनतम दराच्या निविदाधारकास देण्यात आल्या आहेत.
(३) जलशुध्दीकरण संयंत्र बसविल्यानंतर कंत्राट करारानुसार पहिल्या टप्प्यातील ५० वॉटर एटीएमकरीता १ वर्षाचा संचलन व देखभाल कालावधी पूर्ण झाल्यानंतर महानिर्मिती कंपनीने संबंधित ग्रामपंचायतीस हस्तांतरीत केले आहेत. उक्त वॉटर एटीएम बंद असल्याची तक्रार प्राप्त झाली नसल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंदपूर व महानिर्मिती कंपनीने कळविले आहे. दुसऱ्या टप्प्यातील वॉटर एटीएम उभारणीचे काम सुरु आहे.
(४) जलशुध्दीकरण संयंत्राची किंमत ही महानिर्मिती कंपनीने काढलेल्या स्पर्धात्मक निविदेव्दारे १०००, १५०० व २००० लिटर क्षमतेच्या जलशुद्धीकरण संयंत्राची किंमत अनुक्रमे ८.०२ लक्ष, ९.४५ लक्ष व १०.०७ लक्ष एवढी आहे.
(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जालना जिल्ह्यातील शेतकरी अनुदानापासून वंचित असल्याबाबत

**(३६) * ७८९ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या ५ लाख ९० हजार शेतकऱ्यांना शासनाने पहिल्या टप्प्यात ११० कोटी व दुसऱ्या टप्प्यात २४० कोटी रुपयांचा निधी दिल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गाव पातळीवर लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या तयार करताना केवळ तलाठी आणि ग्रामसेवकांच्या चुकांमुळे साडेतीन हजार शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने लाभार्थ्यांना अनुदान मिळण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) जालना जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये "क्यार" व "महा" चक्रिवादळामुळे झालेल्या अवेळी पावसामुळे एकूण ५९०५७४ शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे नुकसान झाले असून बाधित शेतकऱ्यांना वाटपासाठी अद्यापपर्यंत शासन निर्णय, दिनांक १९/११/२०१९, दिनांक १३/१२/२०१९ व दिनांक ०१/०२/२०२० अन्वये ३ टप्प्यांमध्ये एकूण रुपये ४२९.४४ कोटी एवढा निधी वितरीत करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## एसएनडीएल कंपनीने महावितरणचे बिल थकविल्याबाबत

**(३७) * २०४२ डॉ.परिणय फुके, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर शहरातील महाल, गांधीबाग व सिव्हील लाईन्स विभागातील वीज वितरण व्यवस्था सांभाळण्याऱ्या एसएनडीएल कंपनीने आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याकारणाने सदर भागात वीज वितरण व्यवस्था सांभाळण्यास असमर्थता दर्शवली होती, त्यामुळे महावितरण या विभागातील वीज वितरण व्यवस्था ताब्यात घेत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एसएनडीएलकडून महावितरणला रुपये २२५ कोटीची बिल येणे बाकी असताना महावितरणने एसएनडीएलची रुपये १० कोटी बँक गॅरंटी जप्त करण्याचा दावा करुन आता केवळ रुपये १ ते २ कोटी एसएनडीएलकडून येणे असल्याचे जाहीर केल्याने महावितरण उर्वरित बिलांची रक्कम एसएनडीएलकडून कशाप्रकारे वसूल करणार आहे, याबाबतचा खुलासा केला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणातील हिशोबांचे दोन महिन्यात लेखापरिक्षण करुन खरे काय आहे ते सादर करण्याचे निर्देश तत्कालीन ऊर्जा मंत्री यांनी दिले असून आता चार महिन्यांचा कालावधी होऊनही सदर लेखापरिक्षण पूर्ण झाले नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) महावितरण कंपनीने नागपूर शहरातील महाल, गांधीबाग व सिव्हील लाईन्स या विभागातील वीज वितरण, देखभाल दुरुस्ती संबंधित इतर सर्व कामांसाठी मे.स्पॅनको लिमिटेड (मे.एसएनडीएल) यांची वितरण फ्रॅन्चाइझी म्हणून १५ वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती केलेली होती व या तीन विभागांची संपूर्ण वीज वितरण प्रणाली दिनांक ०१/०५/२०११ पासून त्यांच्याकडे हस्तांतरीत करण्यात आली होती.

वीज वितरण फ्रॅन्चाइझीच्या कालावधीत मे.एसएनडीएलमार्फत महावितरणकडून फ्रॅन्चाइझी करारातील तरतुदीनुसार वेळोवेळी देण्यात आलेल्या बिलाच्या पूर्ण रकमेचा भरणा विहित कालावधीत करण्यात येत

नव्हता. मे.एसएनडीएलने दिनांक १२/०८/२०१९ रोजीच्या पत्राद्वारे कंपनीच्या अनिश्चित आर्थिक परिस्थितीची माहिती दिली व त्यानंतर मे.एसएनडीएलने दिनांक ०६/०९/२०१९ रोजीच्या पत्राद्वारे पुन्हा एकदा वितरण फ्रॅन्चाइझी करारांतर्गत आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थता दर्शविली आणि महावितरण कंपनीला तातडीने पाऊल उचलण्याची व आर्थिक अडचणीमुळे वितरण फ्रॅन्चाइझी ऑपरेशन ताब्यात घेण्याची विनंती केली होती. तद्नंतर वितरण फ्रॅन्चाइझी करारातील तरतुदीनुसार दिनांक ०७/०९/२०१९ रोजी एसएनडीएलला नोटीस देऊन दिनांक ०९/०९/२०१९ रोजी शून्य तासापासून महावितरणने महाल, गांधीबाग व सिव्हील लाईन्स या तीन विभागातील वीज वितरणाचे संचालन महावितरणने ताब्यात घेतले. दिनांक ०९/०९/२०१९ पासून महावितरण आणि मे.एसएनडीएलने १ महिना मिळून तीनही विभागांचे समांतर संचालन केले व दिनांक ०९/१०/२०१९ रोजी महावितरणने तीनही विभागाचे संचालन पूर्णपणे ताब्यात घेतले आहे.

(२) व (३) मे.एसएनडीएलने विविध कारणांसाठी सुमारे रुपये ८८ कोटी रकमेचे दावे महावितरणकडे सादर केलेले आहेत. त्या विवादास्पद दाव्यांपोटी वितरण फ्रॅन्चाइझी करारातील तरतुदीनुसार कायमस्वरुपी विवाद समिती (Permanent Dispute Resolution Body) गठीत करण्यात आलेली आहे.

सदर समितीच्या निर्णयानंतरच मे.एसएनडीएलचे संपूर्ण लेखा परिक्षण करुन वितरण फ्रॅन्चाइझी तरतुदीनुसार अंतिम हिशोबाची प्रक्रिया पूर्ण करता येईल.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील सहकारी साखर कारखान्यांमधील नोकर भरतीवर बंदी घातल्याबाबत

**(३८) * ७४३ श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व सहकारी साखर कारखान्यांमधील नोकर भरतीवर शासनाने बंदी घातली असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रत्येक कारखान्याच्या कर्मचाऱ्यांचा आकृतिबंध तयार करुन कधीपर्यंत नोकर भरती करण्यात येणार आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) होय.
(२) राज्यातील सहकारी कारखान्यातील अधिकारी/कर्मचारी यांचा सुधारित आकृतिबंध तयार करण्यासाठी साखर संचालक (प्रशासन) यांचे अध्यक्षतेखाली समितीचे दिनांक २५/४/२०१९ रोजी पुनर्गठन करण्यात आले आहे. या समितीचे आकृतिबंध निश्चित करण्याचे कामकाज अंतिम टप्प्यात आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वैदयकीय प्रतिनिधी व औषध विक्री संवर्धन कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत

**(३९) * ९९१ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४७७३४ ला दिनांक १९ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात ४५००० वैदयकीय प्रतिनिधी व औषध विक्री संवर्धन कर्मचारी कार्यरत असून किमान वेतन अधिनियम १९४८ अंतर्गत काम करणाऱ्या विक्री संवर्धन कर्मचाऱ्यांसाठी किमान वेतन निश्चित करण्याबाबत तसेच त्यांच्या

कामाच्या वेळा महानगरपालिका क्षेत्रामध्ये सकाळी १० ते २, दुपारी ४ ते ६ अशा असून इतर क्षेत्रांमध्ये सकाळी १० ते ६ अशा आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अधिनियमाची अंमलबजावणी होण्यासाठी औषध विक्री संघटनांनी अनेकवेळा निवेदन देऊन मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या संदर्भात अधिसूचना क्रमांक एसपीई-२०१०/प्र.क्र.१४३/काम-३ दिनांक १५/०१/२०१४ रोजी काढण्यात आलेल्या अधिसूचनेत बदल करुन महानगरपालिका व इतर क्षेत्रात ही वेळी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत करावी, अशी मागणी औषध विक्री संवर्धन व वैद्यकीय प्रतिनिधी संघटनेने अनेकवेळा केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन औषध विक्री कर्मचारी यांच्यासाठी किमान वेतन निश्चित करण्याचे धोरण राबविण्याबाबत तसेच वैद्यकीय प्रतिनिधी यांच्या कामांच्या वेळेत बदल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) होय, हे खरे आहे. विक्री संवर्धन कर्मचाऱ्यांची कामाची वेळ इतर क्षेत्रांमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ०६.३० वाजेपर्यंत (अर्धा तास विश्रांतीसह) निश्चित केली आहे.
(२) व (३) या संदर्भात निवेदने प्राप्त झाली असून त्यानुषंगाने दखल घेऊन संबंधितांच्या बैठका घेण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सिरमेटी वनक्षेत्र (जि.नांदेड) येथे बिबटा मृत अवस्थेत आढळल्याबाबत

**(४०) * ११७९ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्ह्यातील किनवट परिक्षेत्रांतर्गत सिरमेटी वनक्षेत्रात दिनांक ०६ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास एक मादी जातीचा बिबटा मृत अवस्थेत आढळून आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील चार महिन्यामध्ये बिबटयाच्या मृत्यूची ही दुसरी घटना असून या भागातील बिबटयांचे मृत्यू हे संशयाच्या भोवऱ्यात अडकले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी कर्तव्यात कसूर करणाऱ्या दोषी वन अधिकारी व कर्मचारी यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे आहे.
(२) दिनांक २८/०९/२०१९ रोजी मौजे पवनातांडा नियतक्षेत्र पवनतांडा येथील मालकी क्षेत्रामध्ये एक बिबट मृत अवस्थेत आढळून आला. मृत बिबट्याचे सर्व अवयव जागेवर उपलब्ध होते. सदर प्रकरणात वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

दिनांक ०६/०१/२०२० रोजी नियतक्षेत्र सिरमेटी येथे एक बिबट (मादी) मृत अवस्थेत आढळून आली. मृत बिबट्याचे सर्व अवयव जागेवर उपलब्ध होते. सदर प्रकरणात वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर येथील चोखामेळा वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन मिळत असल्याबाबत

**(४१) * ५०० प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर, श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर येथील समाजकल्याण विभागाव्दारे चालविल्या जाणाऱ्या चोखामेळा वसतिगृहातील विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे भोजन मिळत असल्याचे दिनांक २४ डिसेंबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निकृष्ट भोजनाची तक्रार विद्यार्थ्यांनी समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त यांचेकडे केली असून विद्यार्थ्यांना धरणे आंदोलन करावे लागल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

संत चोखामेळा परिसरातील गड्डीगोदाम नागपूर येथील वसतिगृहात निदर्शनास आले आहे.

(२) होय, अंशत: खरे आहे.

चोखामेळा परिसरातील गड्डीगोदाम नागपूर येथील वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी आंदोलन केले आहे.

(३) चौकशी करून संबंधित वसतिगृहाच्या गृहपालाची बदली करण्यात आली असून वसतिगृहातील भोजन पुरवठादार बदलण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरप (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील वृक्ष लागवड योजना निष्फळ झाल्याबाबत

**(४२) * १०८ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वरप (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील ३३ कोटी वृक्ष लागवड योजनेचा शुभारंभ दिनांक १ जुलै, २०१८ रोजी वा त्यासुमारास तत्कालीन मा.मुख्यमंत्री व वनमंत्री यांच्या उपस्थितीत करण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनेनुसार दहा हजार रोपांची लागवड केली असून या रोपांच्या संरक्षणासाठी शासनाने पुढील पाच वर्षांसाठी लाखो रुपयांची तरतूद केली असता सदर तरतुदीचा विनियोग केवळ कागदावरच राहिल्याने या ठिकाणी ५ हजारांपेक्षा कमी वृक्ष शिल्लक राहिलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने तरतूद केलेल्या लाखो रुपयांपैकी मोठ्या प्रमाणात रक्कम खर्च झालेली असून अर्ध्यापेक्षा अधिक वृक्ष/रोपे नष्ट झाल्याने सदर योजनेत आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) सन २०१८ च्या पावसाळयात १३ कोटी वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत वरप (ता.कल्याण, जि.ठाणे) येथे ९००० रोपांची लागवड करण्यात आलेली आहे. यासाठी पुर्वपावसाळी कामाकरीता रोपवन या बाबीसाठी रुपये ९,९२,६५२ इतक्या अंदाजपत्रकीय तरतूदीपैकी रुपये ८,०६,८६९/- इतका खर्च झालेला आहे. तसेच प्रथम वर्षी कामासाठी करण्यात आलेल्या रुपये १४,६३,७६५/- इतक्या अंदाजपत्रकीय तरतूदीचा संपूर्ण खर्च झालेला आहे.

अंदाजपत्रकीय तरतूदीनुसार पूर्व पावसाळी व प्रथम वर्षीय कामांवर उपरोक्त प्रमाणे बाबवार खर्च केला असून व्दितीय वर्षापासून रोपवनाचे संगोपन, देखभाल, परिरक्षण करण्यात येत आहे. सदर रोपवनातील जिवंत रोपांची टक्केवारी माहे ऑक्टोबर, २०१८ मध्ये ८५%, मे, २०१९ मध्ये ७२% ऑक्टोबर, २०१९ मध्ये ८७.२४% आहे. आजमितीस एकूण ७८५२ इतकी रोपे जिवंत आहेत.

याबाबत स्थानिक नागरीकांनी आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप केलेला नाही. तथापि, अशा आशयाच्या बातम्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाल्या होत्या. सदर प्रकरणी चौकशी केली असता या प्रकरणी कोणताही गैरव्यवहार झाल्याचे आढळून आले नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सौर ऊर्जेसारख्या अक्षय ऊर्जास्रोतांना प्रोत्साहन देण्याबाबत

**(४३) * १३६१ श्री.विलास पोतनीस, श्री.विजय उर्फ भाई गिरकर, श्री.प्रविण दरेकर, श्री.रामनिवास सिंह, श्रीमती स्मिता वाघ, श्री.नागोराव गाणार, श्री.रमेशदादा पाटील :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारंपरिक ऊर्जेवरील अवलंबत्व कमी करण्यासाठी सौर ऊर्जेसारख्या अक्षय ऊर्जास्रोतांना प्रोत्साहन देण्याची केंद्र शासनाची योजना असतानाही राज्यातील महसूल कमी होऊ नये, यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून या योजनेचे अनुदान किंवा योजना बंद झाल्याचे ग्राहकांना सांगण्यात येवून या योजनेत अडथळा निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे दिनांक २० जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेमुळे उच्च वापर ग्राहकांच्या विजेची मागणी कमी झाल्याची बाब निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यात सौर ऊर्जेसारख्या अक्षय ऊर्जास्रोतांना प्रोत्साहन देवून सदर योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) केंद्र शासनाने दिनांक २६ जून, २०१४ साली छतावरील पारेषण संलग्न सौर ऊर्जा संयंत्रासाठी ३०% केंद्रिय वित्तीय सहाय्याचे धोरण जाहीर केले होते. तद्नंतर सन २०१५ साली केंद्र शासनाने राष्ट्रीय सौर ऊर्जा मिशन जाहीर केले.

मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणाकरीता नक्त मापन, विनियम, २०१५ प्रसिध्द झाल्यानंतर छपरावरील सौर ऊर्जा निर्मितीत हवा तितका प्रतिसाद न मिळाल्याने व बदलत असलेल्या परिस्थितीचा विचार करता तसेच मोठे ग्राहक सौर ऊर्जा प्रकल्पाकडे वळल्याने होणाऱ्या क्रॉस सबसिडीच्या तोटयामुळे इतर ग्राहकांवर

वीज दर वाढवण्याचे संकट येऊ शकते, अशी शक्यता महावितरण कंपनीने व्यक्त केल्याने या सर्वांचा आढावा घेऊन मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक २६ ऑक्टोबर, २०१९ च्या जाहीर सुचनेनुसार प्रारुप ग्रीडला जोडलेली परस्पर सक्रीय छपरावरील नुतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा विनियम, २०१९ चा मसुदा प्रसिध्द करुन त्यावर जाहीर अभिप्राय, सूचना व हरकती मागविल्या. प्राप्त झालेले अभिप्राय, सूचना व हरकती विचारात घेऊन मा.आयोगाने वरील विनियम दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी अंतिमत: प्रसिध्द केले आहेत. ही व्यवस्था सर्व वर्गवारीतील वीज ग्राहकांसाठी लागू आहे. असे करत असताना मा.आयोगाने ग्राहक, व्यावसायिक व वितरण कंपनी इ.च्या सर्वसमावेश हिताचा विचार केलेला आहे.

आता केंद्र शासनाने माहे मार्च, २०१९ मध्ये केंद्रिय वित्तीय सहाय्यित/पारेषण संलग्न रुफ टॉप सौर विद्युत संयंत्र-२ ही योजना जाहीर केली असून राज्यात सदर योजनेची अंमलबजावणी राज्यातील वीज वितरण कंपन्या आहेत. सदर योजना राबविण्यासाठीची प्रक्रिया सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) सदर योजनेमुळे महावितरणव्दारा माहे डिसेंबर, २०१९ पर्यंत स्थापित क्षमता ४४४ मेगावॅट इतकी आहे. यापैकी घरगुती ग्राहकांचा हिस्सा २५% असून वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहकांचा हिस्सा ७५% आहे. यावरुन वाणिज्यिक व औद्योगिक ग्राहक प्रामुख्याने रुफ टॉप सौर स्थापित करीत आहेत. त्यामुळे उच्च वापर ग्राहकांच्या विजेची मागणी या योजनेमुळे काही प्रमाणात कमी झाली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) पारेषण संलग्न रुफ टॉप सौर विद्युत संयंत्र-२ ही योजना ग्रीडला जोडलेली परस्पर सक्रीय छपरावरील नुतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा विनियम, २०१९ नुसार वर्गवारीतील ग्राहकांकरीता वीज वितरण कंपन्याद्वारे राबविण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उरण (जि.रायगड) येथे कांदळवन नष्ट करण्यात आल्याबाबत

**(४४) * ११३३ श्री.रविंद्र फाटक, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण तालुक्यातील (जि.रायगड) निसर्ग संवर्धनासाठी तसेच किनारपट्टीची धूप थांबवण्यासाठी आवश्यक असणारे कांदळवन नष्ट करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उरण परिसरात सिडकोच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात खारफुटी असून उक्त ठिकाणी कचरा तसेच राडारोडा टाकून आगी लावून व रसायनांचा वापर करुन कांदळवन नष्ट करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार शासनस्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि, मा.उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये दिनांक १७/०९/२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार शासन निर्णय, दिनांक १६/१०/२०१८ अन्वये राज्यातील सागरतटीय जिल्ह्यांकरीता कांदळवन संरक्षण व संवर्धन करण्यासाठी विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली संनियंत्रण समिती गठीत करण्यात आली आहे. कांदळवन ऱ्हासाच्या अनुषंगाने प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने सदर समितीमार्फत कार्यवाही केली जाते.

-----------------

## मुंडीपार एमआयडीसी (जि.गोंदिया) परिसरात ट्रॅक्शन सबस्टेशन वाहिनी विना परवानगी उभारण्यात येत असल्याबाबत

**(४५) * ११२४ प्रा.जोगेन्द्र कवाडे, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोंदिया येथील मुंडीपार एमआयडीसी परिसरात ट्रॅक्शन सबस्टेशन वाहिनी उभारण्याचे काम विना परवानगी तसेच जमिनीचा मोबदला न देताच सुरु असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना प्रति टॉवर रुपये ३ लाख देण्याचे ठरले असताना रुपये २ लाख २५ हजार फक्त देण्यात येत होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना पूर्वनियोजित रक्कम न देता कमी रक्कम देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करुन अन्यायग्रस्त शेतकऱ्यांना पूर्वी ठरलेली रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१), (२) व (३) गोंदिया हिराडामाली १३२ के.व्ही. ट्रॅक्शन सबस्टेशन वाहिनीची उभारणी रेल्वे इलेक्ट्रिफिकेशन, सिकंदराबाद तर्फे करण्यात येत आहे. सदर कामास अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपूर विभाग यांच्या मान्यतेनंतर वाहिनीचे काम सुरु करण्यात आले. जिल्हाधिकारी, गोंदिया यांच्यामार्फत भारतीय टेलिग्राफ कायदा १८८५ च्या कलम १० अनुसार वाहिनीग्रस्तांना मोबदल्याची रक्कम ठरविण्यात आली. त्यानुसार वाहिनीग्रस्तांना मोबदल्याची रक्कम अदा करुन रेल्वे विभागातर्फे महापारेषण कंपनीच्या देखरेखीखाली वाहिनीचे काम सुरु आहे.

सदर वाहिनीच्या ६१ मनोरा स्थळापैकी ०८ मनोरा स्थळावरच्या जमीनधारकांनी विरोध केला असून मोबदल्याच्या रकमेत वाढ करण्याबाबत जिल्हाधिकारी, गोंदिया यांना निवेदन दिले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे भूखंड अमेरिकेच्या "वॉलमार्ट" कंपनीला देण्याचा निर्णय घेण्यात आल्याबाबत

**(४६) * ४६४ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा** : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या प्रचलित धोरणात बदल करुन सध्याच्या निविदा (लिलाव) पध्दतीऐवजी लिलाव न करता मऔविमचे भूखंड अमेरिकेच्या "वॉलमार्ट" या बहुराष्ट्रीय कंपनीला वाणिज्यिक प्रयोजनासाठी देण्याचा निर्णय माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला असून खुल्या बाजारातील किंमतीपेक्षा हे भूखंड अतिशय कमी किंमतीत उपलब्ध करण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निविदा प्रसिध्द करुन भूखंड वितरीत केल्यास महामंडळाला अधिकचे उत्पन्न मिळेल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे आर्थिक नुकसान होणार असतानांही धोरणात बदल करुन "वॉलमार्ट" कंपनीला अशाप्रकारे भूखंड देण्याचा निर्णय घेण्याची कारणे काय आहेत,

(४) तसेच, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मऔविमचे म्हणजेच पर्यायाने राज्याचे आर्थिक नुकसान होऊ नये यासाठी उक्त निर्णयाचा फेरविचार करुन भूखंड वाटपासाठी पूर्वीच्याच धोरणानुसार निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुभाष देसाई :** (१), (२), (३), (४) व (५) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दिनांक २३/०८/२०१९ रोजी झालेल्या ३८३ व्या बैठकीत पारित ठराव क्र.५९७६ अन्वये मे.वॉलमार्ट कंपनीस भूखंडाचे वाटप करताना नजिकच्या कालावधीत (वाणिज्यक भूखंडासाठी) लिलावाव्दारे प्राप्त झालेल्या उच्चतम दराने भूखंड वाटप करण्याचा निर्णय घेण्यात आला

आहे. लहान भूखंडास निविदेव्दारे प्राप्त होणारा दर हा मोठ्या भूखंडास प्राप्त होणाऱ्या दरापेक्षा अधिक असतो व अशा लहान भूखंडास निविदेद्वारे प्राप्त होणारा उच्चतम दर मे.वॉलमार्ट कंपनीस वाटपासाठी लावण्यात येणार असल्याने त्यातून महामंडळास अर्थिक लाभ होणार आहे. याशिवाय मे.वॉलमार्ट कंपनीमार्फत मोठ्या प्रमाणात होणारी आर्थिक गुंतवणूक व त्यातून होणारी मोठी रोजगार निर्मिती इतर राज्यात जाऊ नये याचा विचार करून महामंडळाने निर्णय घेतलेला आहे.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील आदिवासींच्या पारंपरिक वस्त्यांमध्ये नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(४७) * २३२७ श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हयातील अनुक्रमे मूल, सावली, जिवती, कोरपणा, राजूरा, ब्रम्हपुरी, सिंदेवाही या तालुक्याच्या दरम्यान आदिवासी वाडा, परदान वाडा व बुरड वाडा अशा नावाने आदिवासींच्या पारंपरिक वस्त्या असलेल्या ठिकाणी आदिवासी समाजाला दैनंदिन जीवनमान उंचविण्याच्यादृष्टीने विकास कामे होणे आवश्यक असताना येथे रस्ते, आरोग्य, पाणी, शाळा, स्वयंरोजगार या महत्त्वाच्या मूलभूत नागरी सुविधा व आवश्यक ती विकास कामे उपलब्ध करून देण्यासाठी आदिवासी ग्रामस्थांनी, तसेच राज्यस्तरीय आदिवासी आढावा समितीच्या प्रतिनिधींनी प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांच्याकडे दिनांक ९ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासींच्या समस्या सोडवून त्यांना नागरी सुविधा पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) हे खरे आहे.

(२) ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधारणा योजनेंतर्गत सदर आदिवासी वाड्यांना आवश्यक सुविधा पुरविण्याकरीता मूल, सावली, जिवती, कोरपणा, राजूरा, ब्रम्हपुरी, सिंदेवाही तालुक्यातील नगरपरिषद/नगरपंचायतीच्या मुख्याधिकाऱ्यांना कामे प्रस्तावित करण्याबाबत प्रकल्प कार्यालय, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, चंद्रपूर यांचे दिनांक १४/११/२०१९ व ०१/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शहापूर (जि.ठाणे) येथील इंडो वेस्टर्न रेप्रिरेशन एजन्सीने दिलेल्या जाहिरातीबाबत

**(४८) * २०६४ डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) मधील इंडो वेस्टर्न रेप्रिरेशन या सुरक्षारक्षक एजन्सीने सोशल मीडियावर "कर्मचारी पाहिजेत" अशी जाहिरात टाकून जाहिरातीमध्ये "स्थानिकांना नोकरी मिळणार नाही" असा स्पष्ट उल्लेख केल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ८० टक्के भूमिपुत्रांना नोकऱ्यांमध्ये रोजगार देणे बंधनकारक असताना अशा प्रकारे जाहिरात देऊन स्थानिकांना नोकरी मिळणार नसल्याचे सांगणाऱ्या इंडो वेस्टर्न रेप्रिरेशन एजन्सीवर बंदी घालण्यासाठी स्थानिकांनी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर एजन्सीने दिलेल्या जाहिरातीबाबत चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त एजन्सीवर तात्काळ बंदी घालण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.

मे.इंडो वेस्टर्न रेप्रिरेशन या नावाची एजन्सी अस्तित्वात नसून मे.इंडो वेस्टर्न रेप्रिरेशन प्रा. लि. या नावाची कंपनी शहापूर, जि.ठाणे अस्तित्वात आहे. सदर कंपनीस मे.सिक्युरिटी ॲण्ड इंटेलिजन्स सर्व्हिसेस इंडिया प्रा. लि. या सुरक्षा रक्षक पुरविणाऱ्या खाजगी एजन्सीच्या ऑपरेशन्स एक्सीक्युटिव्ह यांनी त्यांच्या वैयक्तिक whatsup ग्रुप वर दिनांक २२/०१/२०२० रोजी इंडो वेस्टर्न रेफ्रिजरेशन या कंपनीत सुरक्षा रक्षक नियुक्त करण्याकरीता "लोकल नही चाहिए" असा संदेश पाठविला असल्याची बाब निदर्शनास आली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) या प्रकरणी कामगार उपायुक्त, ठाणे यांना प्रायव्हेट सेक्युरिटी एजन्सीज (रेग्युलेशन) अधिनियम, २००५ (पसारा) तसेच सुरक्षा रक्षक अधिनियम, १९८१ अंतर्गत व पोलीस विभागाच्या सायबर सेल यांच्या सहाय्याने चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत पीक कर्ज वाटपात अनियमितता झाल्याबाबत

**(४९) * ३७८ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत पीक कर्ज वाटपात अनियमितता केल्याप्रकरणी जिल्हा ग्राहक मंचाने पंजाब नॅशनल बँकेला माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान दंड ठोठावला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील किती बँकानी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या पीक कर्ज वाटपात अनियमितता केल्याचे आढळून आले आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, त्यानुसार सदर बँकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

श्री.वसंत केशवराव गणोरकर, रा.कांडली, पो.परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती यांचे कर्जप्रकरणी छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेच्या एकरकमी परतफेड योजनेंतर्गत लाभ देताना पंजाब नॅशनल बँकेने आकारलेल्या रकमेच्या अनुषंगाने श्री.गणोरकर यांनी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच अमरावती यांचेकडे दाखल केलेल्या तक्रारीवर दिनांक २/११/२०१९ रोजी निर्णय देताना जिल्हा तक्रार निवारण मंचाने तक्रार अंशत: मंजूर करुन तक्रारदाराला रुपये ४४,७६३/- व त्यावर द.सा.द.शे. १० टक्के व्याज देण्याचे आदेश पंजाब नॅशनल बँकेस दिले आहेत.
(२) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजनेंतर्गत पीक कर्ज वाटपात अनियमितता केल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रामटेक शिवारात (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) विद्युत पोल पडल्याबाबत

**(५०) * १५८१ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रामटेक शिवारातील (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) तायडे यांच्या शेतातील विद्युत पोल आणि राजनापूर-खिनखीनी शिवारातील अनेक ठिकाणी विद्युत पोल खाली वाकलेले असणे तसेच कादवी-चिखली रस्त्यावर पोल तारा पूर्णपणे जमीनदोस्त झाल्याचे निदर्शनास येवूनही महावितरण विभागाकडून कोणतीच कार्यवाही झाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतात विद्युत पोल पडून तारा खाली वाकलेल्या असल्याने शेतकऱ्यांचे जीव धोक्यात आल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरणाकडे शेतकऱ्यांनी तक्रारी करुनही कोणतीच कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, महावितरणाच्या बेजबाबदार कारभाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१), (२) व (३) मौजे रामटेक शिवारातील (ता.मुर्तिजापूर, जि.अकोला) येथील श्री.तायडे यांच्या शेतातील विद्युत पोल वाकले असल्याबाबतची तक्रार महावितरण कंपनीच्या मुर्तिजापूर उपविभाग कार्यालय येथे दिनांक २१/०८/२०१९ रोजी प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने महावितरण कंपनीमार्फत सदर ठिकाणची तपासणी करण्यात आली व त्यानंतर मौजे रामटेक शिवारातील श्री.तायडे तसेच मौजा राजनापुर खिनखिनी येथील शेतकऱ्यांच्या शेतातील वाकलेले विद्युत पोल सरळ करण्यात आले व वीज पुरवठा पूर्ववत करण्यात आला. तसेच कादवी-चिखली रस्त्यालगतचे विद्युत पोलजवळ रस्त्याच्या कडेला नाल्याचे खोदकाम करण्यात आले होते. त्या नाल्यामध्ये पावसाळयात पाणी साचल्याने विद्युत खांब जमिनीवर कोसळले. सदर कामाची दुरुस्ती करण्यासाठी महावितरण कंपनीने कंत्राटदारामार्फत काम सुरु केले होते. परंतु सदर ठिकाणच्या शेतातील उभ्या पिकांच्या होणाऱ्या नुकसानीमुळे शेतकऱ्यांनी कामाला आक्षेप घेतला. त्यामुळे शेतकऱ्यांच्या कृषी पंपाचा वीज पुरवठा नजीकच्या दुसऱ्या वीज वाहिनीवरुन सुरु करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळेतील संगणक शिक्षकांवर अन्याय झाल्याबाबत

**(५१) * २०४५ श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्यातील डहाणू व जव्हार आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत शासकीय आश्रमशाळेत ९ ते १० वर्षे सेवा केलेल्या शिक्षकांना डावलून परस्पर अन्य शिक्षकांना सेवेत सामावून घेण्याचे आदेश देण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शैक्षणिक वर्ष सन २००९ ते सन २०१८ पर्यंत सदर शाळांमध्ये शैक्षणिक संस्थेच्या माध्यमातून ३० हून अधिक शिक्षक अल्प मानधनावर काम करीत असून या शैक्षणिक वर्षापासून नवीन शासन आदेशानुसार संस्थेचे अधिकार काढून सदर पदे कंत्राटी पध्दतीने भरण्याचे धोरण स्वीकारले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासन निर्णयामधील जाचक शैक्षणिक अटी कमी करून संगणक शिक्षकांना प्राधान्य देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१), (२) व (३) प्रकल्प कार्यालय, जव्हार व डहाणू अंतर्गत आश्रमशाळांवर सन २००९ ते २०१८ पर्यंत विभागाच्या दिनांक १४/०१/२००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये संगणक प्रशिक्षणासाठी खाजगी संस्थेची निवड केली होती. त्यानुसार संगणक प्रशिक्षणासाठी खाजगी संस्थेने त्यांचेस्तरावर काही व्यक्तींना नेमले होते. त्यामुळे संस्थेने नेमलेल्या संगणक शिक्षकांचा प्रकल्प कार्यालय, जव्हार व डहाणू यांच्या शासकीय आस्थापनेशी थेट संबंध नव्हता.

आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण देण्याची योजना सर्व प्रकल्पामध्ये सुरू नव्हती म्हणून आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना अद्ययावत संगणक ज्ञान व प्रशिक्षण उपलब्ध होणेसाठी विभागाने B.Sc(IT), BCA,

B.E.(Computer), B.Tec(Computer) तसेच MCA, M.Sc.(Computer) अशा पात्रताधारक व्यक्तींना निवडण्याचे आदेश काढले. त्यानुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीने गुणवत्तेनुसार प्रत्येक आश्रमशाळेसाठी एक याप्रमाणे संगणक शिक्षक/निर्देशक यांची निवड केलेली आहे. खाजगी संस्थेच्या माध्यमातुन काम करणाऱ्या उमेदवारांमध्ये सदर पात्रता व गुणवत्ता नसल्याने त्यांची निवड होऊ शकली नाही. खाजगी संस्थेकडे यापुर्वी कार्यरत व्यक्तींना प्राधान्य देण्याची कोणतीही बाब शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कोयना, धोम, कन्हेर व नागेवाडी (जि.सातारा) धरणांच्या निर्मितीसाठी जमिनी दिलेल्या शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळणेबाबत

**(५२) * १०५८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जनार्दन चांदूरकर, अॅड.हुस्नबानू खलिफे, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.मोहनराव कदम, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा जिल्हयातील कोयना, धोम, कन्हेर व नागेवाडी धरणांच्या निर्मितीसाठी जमिनी दिलेल्या शेतकऱ्यांपैकी काही शेतकऱ्यांना जमीन कसण्यासाठी सोलापूर जिल्हयात जमिनी दिल्या होत्या त्या शेतकऱ्यांना आजही शासनाच्या योजनेचा लाभ मिळालेला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सोलापूर जिल्हयात कसण्यासाठी दिलेल्या १०० हून अधिक शेतकऱ्यांची प्रकरणे सोलापूर जिल्हाधिकारी कार्यालयातील पुनर्वसन विभागात गत दहा वर्षापासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने आढावा घेवून प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) सातारा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या १५१ प्रस्तावांपैकी ७२ प्रकल्पग्रस्तांना ७७.८० हे.आर. क्षेत्र जिल्हाधिकारी, सोलापूर कार्यालयाकडून वाटप करण्यात आले आहे. उर्वरित प्रकल्पग्रस्तांच्या प्रस्तावातील त्रुटी/कागदपत्र यांच्या पूर्तते अभावी पर्यायी जमीन वाटपाची कार्यवाही होऊ शकली नाही. यास्तव संबंधित प्रकल्पग्रस्त यांचेशी समन्वय करुन कागदपत्रांच्या पूर्ततेबाबत कार्यवाही चालू आहे.

-----------------

## नागपूर येथील ५५० आरा मशीन विना परवाना असल्याबाबत

**(५३) * ३९१ श्री.गिरीशचंद्र व्यास, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर येथे आरा मशीन ब्रिटीशकालीन परवान्यावर सुरू असून ५५० आरा मशीन विना परवाने असल्याची बाब माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिका क्षेत्रात ३५० व महानगर क्षेत्रात २५० आरा मशीन असून आरा मशीन चालवितांना अग्निशामक विभागाचे नियम व अटींची पूर्तता करणे आवश्यक असतानाही बहुसंख्याक आरा मशीन नियमांची पूर्तता करीत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाचे कारण काय आहेत ?

**श्री.संजय राठोड :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) नगरविकास विभागाच्या अहवालानुसार नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांनी महाराष्ट्र प्रादेशिक नगररचना अधिनियम, १९६६ नुसार आतापर्यंत परवानगी न घेतलेल्या २१ आरागिरण्यांना नोटीस दिल्या आहेत. प्राधिकरणाचे एकूण क्षेत्र ३५६७ चौ.कि.मी. असल्याने व मनुष्यबळाअभावी इतर भागात कार्यवाही करण्यास विलंब होत आहे. तथापि, याप्रकरणी चौकशी सुरु आहे.

अग्निशमन उपाययोजनांची पूर्तता केली नाही अशा महानगरपालिका हद्दीतील १७० व सीमेलगत असलेल्या ७ अशा एकूण १७७ आरामशीन मालकांना महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६ चे कलम ६ अंतर्गत नोटीस दिल्यानंतर, विहित कालावधीत उपाययोजना न केल्यामुळे, या अधिनियमाच्या कलम ८(१) अंतर्गत ६१ आरामशीन मालकांना धोकादायक इमारतीतून दूर निघून जाण्याबाबत, ३८ आरामशीनचा विद्‌युत व पाणीपुरवठा खंडीत करण्याबाबत संबंधित प्राधिकरणाला कलम ८(२)क अंतर्गत आणि २ आरा मशीनवर इमारतीतून/ तिच्या भागातून व्यक्तींना हलविण्याबाबत संबंधित पोलीस विभागाला निर्देश देण्याबाबत, तर एकूण १५ आरामशीनवर फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत संबंधित पोलीस विभागाला निर्देश देण्याबाबतची नोटीस बजाविण्याची कार्यवाही नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाकडून करण्यात आलेली आहे.

-----------------

## रुमित केमिसिंथ (ता.शिरपूर, जि.धुळे) या रासायनिक कंपनीत झालेल्या स्फोटात जिवितहानी झाल्याबाबत

**(५४) * १२७२ श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर, श्रीमती विद्‌या चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.ख्वाजा बेग, श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **कामगार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुमित केमिसिंथ कंपनीमध्ये (ता.शिरपूर, जि.धुळे) भीषण स्फोट झाल्याचे दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या स्फोटात १३ जणांचा मृत्यू व ४० जण गंभीर जखमी झाले असता शासनामार्फत मृतांच्या वारसांना रुपये ५ लाखाची आर्थिक मदत तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी जाहीर केली असून ही आर्थिक मदत अनेकांना मिळाली नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृतांच्या वारसांना आर्थिक मदत मिळण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील** : (१), (२) व (३) रूमित केमिसिंथ प्रा.लि., शिरपुर (जि.धुळे) या कारखान्यात दिनांक ३१/०८/२०१९ रोजी उत्पादन प्रक्रिया सुरु असताना नायट्रेशन रिॲक्टरचा स्फोट होवून स्फोटाची व आगीची घटना घडलेली आहे.

सदर घटनेमध्ये कारखान्यातील ८ कामगार व कारखान्याबाहेरील ६ व्यक्ती अशा एकूण १४ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. तसेच कारखान्यातील ३५ कामगार व कारखान्याबाहेरील ३२ व्यक्ती असे एकूण ६७ व्यक्ती जखमी झाले आहेत.

सदर घटनेची औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयामार्फत चौकशी करण्यात आली आहे.

कारखाना व्यवस्थापनाकडून मयत कामगार/व्यक्तींच्या अवलंबितास प्रत्येकी रुपये ५ लक्ष इतक्या रकमेची आर्थिक मदत देण्यात आली आहे. तर कायमचे अपंगत्व आलेल्या दोन कामगारांस प्रत्येकी रुपये २.५० लक्ष इतक्या रकमेची आर्थिक मदत देण्यात आली आहे.

मा.पंतप्रधान, भारत सरकार यांचे कार्यालयाकडून मयत कामगार / व्यक्तींच्या अवलंबितास प्रत्येकी रुपये २ लक्ष आणि कारखान्यातील घटनेत गंभीर जखमी झालेल्या २० कामगार/व्यक्तींना प्रत्येकी रुपये ५० हजार इतक्या रकमेची आर्थिक मदत देण्यात आलेली आहे.

सदर दुर्घटनेत शासनामार्फत मृतांच्या वारसांना रुपये ५ लक्ष इतक्या आर्थिक मदतीबाबत तत्कालीन मा.मुख्यमंत्री यांनी जाहीर केल्याच्या अनुषंगाने मा.मुख्यमंत्री कार्यालयाकडून प्राप्त माहितीनुसार जिल्हाधिकारी कार्यालय, धुळे यांचेकडून कोणताही अहवाल/प्रस्ताव/निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

मे.रुमित केमिसिंथ प्रा.लि., शिरपूर, जि.धुळे या कारखान्यात दिनांक ३१/०८/२०१९ रोजी झालेल्या अपघाताबाबत सखोल चौकशी व अशा घटनांची पुनरावृत्ती होवू नये याकरीता दिनांक १३/०९/२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय अधिकारी व तज्ञ व्यक्तींची समिती गठित करण्यात आली होती. सदर समितीने नुकताच चौकशी अहवाल सादर केला असून त्यावर शासनस्तरावरुन पुढील कार्यवाही सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद मधील बहुमजली इमारतींमध्ये बसविले जाणारे उद्वाहक (लिफ्ट) बाबत

**(५५) * ८१३ श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद शहरातील बहुमजली इमारतीमध्ये उद्वाहक (लिफ्ट) बसविण्याची परवानगी मुंबईमधून घ्यावी लागत असल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वार्षिक परिक्षण करणारे कर्मचारीही मुंबईमधून कागदांवरच परिक्षण करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे नाही. उद्वाहन उभारणीचा व चालविण्याचा परवाना देण्याचे अधिकार दिनांक २७ जून, २०१९ च्या अधिसूचनेनुसार मुंबई, पुणे, औरंगाबाद व नागपूर येथील अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ यांना प्रदान करण्यात आले आहेत. सदर कामांना परवाने देण्याकरीता ऑनलाईन प्रणालीद्वारे अर्जदाराकडून अर्ज अपलोड करण्यात येतात. तद्नंतर मुंबई, मुंबई उपनगर, पालघर, ठाणे व पुणे या जिल्ह्यासाठी विद्युत निरीक्षक (उद्वाहन), मुंबई व उर्वरित जिल्ह्यांसाठी विद्युत निरीक्षक

(सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक), मुंबई यांच्या डॅशबोर्डवरुन अर्जाची छाननी होऊन, अर्ज स्वीकृत करण्यात येतात. सदर अर्ज ऑनलाईन प्रणालीद्वारे संबंधित सहाय्यक विद्युत निरीक्षक यांना पाठविण्यात येतात. क्षेत्रियस्तरावरील संबंधित प्रादेशिक मंडळाच्या सहाय्यक विद्युत निरीक्षक यांच्याकडून निरीक्षणे करुन त्यानंतर निरीक्षण अहवाल विद्युत निरीक्षक (उद्वाहन), मुंबई व विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक), मुंबई यांच्यामार्फत संबंधित अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ यांच्या डॅशबोर्डवर शिफारशीसह सादर करण्यात येतात. निरीक्षण अहवालाप्रमाणे व त्यावरील शिफारशीनुसार पुढील अंतिम परवानगी संबंधित अधीक्षक अभियंता, प्रादेशिक विद्युत निरीक्षण मंडळ यांच्यामार्फत देण्यात येते.

(२) हे खरे नाही. विद्युत निरीक्षक (उद्वाहन), मुंबई व विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक), मुंबई अंतर्गत क्षेत्रियस्तरावर संबंधित प्रादेशिक मंडळात कार्यरत सहाय्यक उद्वाहन निरीक्षक तथा सहाय्यक अभियंता, शाखा अभियंता/कनिष्ठ अभियंता यांच्याकडून वार्षिक निरीक्षणे करण्यात येतात व त्यासंबंधीचा अहवाल निरीक्षण केलेल्या अधिकाऱ्यांकडून थेट विद्युत निरीक्षक (उद्वाहन) मुंबई व विद्युत निरीक्षक (सचिव, अनुज्ञापक मंडळ व उद्वाहन निरीक्षक) उद्वाहन यांच्याकडे सादर करण्यात येतो. निरीक्षणांतर्गत आढळून आलेल्या उणिवांची पूर्तता करण्याकरीता संबंधित अधिकाऱ्यांकडून उपभोक्ता ग्राहकास ज्ञापन देण्यात येते.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## भंडारा शहरासह ग्रामीण भागातील विद्युत रोहित्रांची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत

**(५६) * २०४३ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भंडारा शहरासह ग्रामीण भागातील विद्युत रोहित्राच्या बाजूला झाडेझुडपे व कचरा मोठ्या प्रमाणात वाढत असून बहुतांश विद्युत रोहित्रे उघड्या स्थितीत असल्याने या रोहित्रांच्या देखभाल, दुरुस्तीकडे दुर्लक्ष होत असल्याने एखादी घटना घडून मोठी दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा शहरात ४५० पेक्षा जास्त रोहित्रांची संख्या असून रहिवासी परिसरात असलेल्या डीपीची दुरवस्था झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत भंडारा शहरासह ग्रामीण भागातील विद्युत रोहित्रांची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री व मा.ऊर्जा मंत्री यांचेकडे पत्राद्वारे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने विद्युत रोहित्रांची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) व (२) महावितरण कंपनीच्या भंडारा मंडलांतर्गत भंडारा शहर उपविभागामध्ये एकूण ३५४ रोहित्र कार्यरत आहेत व भंडारा ग्रामीण उपविभागामध्ये एकूण ९९१ रोहित्र कार्यरत आहेत. सदर रोहित्रांच्या प्रतिबंधात्मक देखभाल (Preventive Maintenance) करीता भंडारा शहर व भंडारा ग्रामीण उपविभागाकरीता निविदेद्वारे Empanel केलेल्या संस्थेस काम देण्यात आले. रोहित्राच्या जुन्या झालेल्या वितरण पेट्यांच्या दुरुस्तीची कामे नियमितपणे करण्यात येतात. सन २०१९-२०२० दरम्यान १०० रोहित्रांची देखभाल व दुरुस्ती करण्यात आलेली आहे. तसेच रोहित्र दुरुस्तीच्या वेळी व इतर वेळी रोहित्रांच्या आजुबाजुला वाढलेली झाडे झुडपे व गवत नियमितपणे काढण्यात येते.

(३) सन २०१९ मध्ये भंडारासह ग्रामीण भागातील विद्युत रोहित्रांची देखभाल दुरुस्ती करण्याबाबत नागरिक, स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.ऊर्जा मंत्री यांचेकडे भंडारा येथे दिनांक १७/११/२०१९ रोजी झालेल्या आढावा सभेमध्ये मागणी केलेली होती.

(४) उक्त प्रकरणी भंडारा महावितरण मंडल कार्यालयामार्फत चौकशी केली असून, चौकशीच्या अनुषंगाने ३२ ठिकाणी रोहित्रांची किरकोळ देखभाल व दुरुस्तीची कामे Empanel कंत्राटदारामार्फत करण्यात आली आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात आश्रमशाळा चालविण्यात येणाऱ्या संस्थांच्या इमारतीचे भाडे पूर्वीप्रमाणे सुरु ठेवण्याबाबत

**(५७) * ९९७ डॉ.सुधीर तांबे, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.विक्रम काळे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.मोहनराव कदम, डॉ.वजाहत मिर्झा : तारांकित प्रश्न क्रमांक ४५२०३ ला दिनांक २२ नोव्हेंबर, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आश्रमशाळा चालविण्यात येणाऱ्या संस्थांना इमारतींना सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरवुन दिलेल्या रकमेचे ७५ टक्के भाडे पुर्वीप्रमाणे सुरु करण्याची मागणी व्यवस्थापनाने संबंधित विभागाकडे केली असल्याचे दिनांक ७ मार्च, २०१८ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सदर संस्थांना ७५ टक्के भाडे नियमित देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१), (२) व (३) आदिवासी विकास विभागाच्या पूर्वीच्या आश्रमशाळा संहितेमध्ये संस्थेने स्वत:ची इमारत शाळा सुरु केल्यापासून २ वर्षात पूर्ण करणे बंधनकारक राहील, अशी तरतूद होती. आदिवासी विकास विभागांतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या सर्व अनुदानित आश्रमशाळा या अनेक वर्षापासून सुरु असून गेल्या १० वर्षात एकही नविन आश्रमशाळा सुरु झालेली नाही.

स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या अनुदानित आश्रमशाळांना शासनामार्फत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पूर्ण वेतन व भत्ते देण्यात येतात. तसेच विद्यार्थ्यांच्या अल्पोपहार व भोजनासाठी प्रतिमाह प्रतिविद्यार्थी देण्यात येणाऱ्या परिपोषण अनुदानात वाढ करुन सदर अनुदान नुकतेच रुपये १५००/- इतके केलेले आहे. याव्यतिरिक्त सदर संस्थांना विद्यार्थ्यांच्या दैनंदिन खर्चासाठी व इतर अनुषंगिक बाबींसाठी आकस्मिक अनुदान दिले जाते. राज्य शासन अनुदानित आश्रमशाळांवर दरवर्षी सुमारे रुपये १३०० कोटी पेक्षा अधिक खर्च करीत आहे. अनुदानित आश्रमशाळेच्या परिचालनामध्ये स्वयंसेवी संस्थांचे योगदान देखील आवश्यक आहे. स्वयंसेवी संस्थांनी आश्रमशाळांसाठी इमारत बांधकाम करुन सर्व भौतिक सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

-----------------

## मौजे लव्हुरी (ता.केज, जि.बीड) येथील कुंभारमाळ ट्रान्सफार्मर बसविण्यास विलंब होत असल्याबाबत

**(५८) * १९९४ श्री.विनायकराव मेटे :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे लव्हुरी (ता.केज, जि.बीड) येथील कुंभारमाळ ट्रान्सफार्मरला महावितरण कंपनीने दिनांक २४ नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मंजुरी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरण कंपनीने ट्रान्सफार्मर बनविण्याकरीता ठेकेदारास कार्यारंभ आदेश दिला होता, ट्रान्सफार्मर मंजुरी तसेच कार्यारंभ आदेश देऊन तीन वर्षे उलटली तरीही सदरील ठेकेदाराने ट्रान्सफार्मर बसविला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या संदर्भात अधिकृत कोटेशन असलेल्या शेतकऱ्याने वारंवार लेखी व तोंडी निवेदने कार्यकारी अभियंता, अंबाजोगाई, सहाय्यक अभियंता केज यांना दिली तरीही कोणतीही कार्यवाही महावितरणच्या अधिकाऱ्यांनी ठेकेदारांवर केली नसुन कुंभारमाळ ट्रान्सफार्मर व्यतिरीक्त तालुका व जिल्हामध्ये महावितरणच्या अधिकाऱ्यांने ठेकेदाराचे आर्थिक संगनमत असल्याने याचा नाहक त्रास शेतकऱ्यांना होतो, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरील महावितरणाच्या अधिकारी व ठेकेदांराना काळया यादीत टाकण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) हे खरे आहे.

(२) व (३) मौजे लहुरी (ता.केज, जि.बीड) कुंभारमाळ रोहित्रास नवीन कृषीग्राहकांना विद्युत पुरवठा करण्याकरीता व जुन्या रोहित्रावरील भार कमी करण्याकरीता मराठवाडा विशेष योजनेंतर्गत मंजुरी देण्यात आली असून दिनांक २४/११/२०१७ रोजी ठेकेदारास कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. सदरील रोहित्रावर एकूण ७ नवीन ग्राहक होते. सदर रोहित्रांचे काम कार्यारंभ आदेश दिल्यानंतर ठेकेदाराने सुरु केले होते. परंतु सदर ठिकाणी विहिरीचे काम अर्धवट असल्यामुळे विद्युत पोल उभे करण्यासाठी अडचणी येत होत्या. तथापि, सदर रोहित्राचे काम माहे जानेवारी, २०२० मध्ये पूर्ण झाले असून सदर रोहित्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

(४) सदर रोहित्रांचे काम विहित वेळेत पूर्ण न केल्याबाबत संबंधित कंत्राटदाराविरुध्द निविदेतील तरतूदीनुसार दंडात्मक कारवाई महावितरण कंपनीमार्फत करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अनुसूचित जातीतील युवकांना विद्यावेतन मिळण्याबाबत

**(५९) * ५६५ प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.रामदास आंबटकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील अनुसूचित जातीतील युवकांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्थेतर्फे स्पर्धा परिक्षेकरीता प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना गेल्या सहा महिन्यापासून विद्यावेतन मिळाले नसल्याचे दिनांक २२ ऑगस्ट, २०१९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रशिक्षणार्थ्यांना विद्यावेतन देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे :** (१) व (२) हे खरे नाही.

महासंचालक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे मार्फत किरण फांऊडेशन चंद्रपूर येथे दिनांक ०८/१०/२०१८ ते ०७/०२/२०१९ या चार महिने कालावधीमध्ये IBPS प्रशिक्षण कार्यक्रमाची बॅच (क्र.२) स्पर्धा परीक्षा पुर्व प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. सदर विद्यार्थ्यांची उपस्थितीत अहवालाची पडताळणी करुन विद्यावेतनास पात्र असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या बँक खात्यामध्ये रक्कम वितरीत करण्यात आली होती मात्र SBI (State Bank Of India) खात्या व्यतिरीक्त ज्या विद्यार्थ्यांचे बँक खाते इतर बँकेमध्ये आहेत, अशा विद्यार्थ्यांना अदा करण्यात आलेली विद्यावेतनाची रक्कम मिळालेली नाही. सदरहू तांत्रिक बाब निदर्शनास आल्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे बार्टी या कार्यालयाकडून State Bank Of India पुणे कॅम्प शाखा यांचेमार्फत विदर्याथ्यांना रक्कम अदा करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांची गैरसोय होत असल्याबाबत

**(६०) * २११३ श्री.रविंद्र फाटक, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय आश्रमशाळांमध्ये आवश्यक सोयी सुविधा नसल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांची अवस्था दयनिय झाली असून मागील वर्षात आठ आदिवासी विद्यार्थ्यांचे मृत्यू झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विद्यार्थ्यांचे पालकत्व स्वीकारलेले मुख्याध्यापक, अधीक्षक, आश्रमशाळेत राहत नसल्याची बाब दिसून आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आदिवासी आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यूचे प्रकार रोखण्यासाठी व आश्रमशाळांमध्ये अद्यावत सोयी सुविधा पुरविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी :** (१) आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांचे मृत्यू हे आश्रमशाळेतील असुविधामुळे झालेले नसून अन्य विविध कारणांमुळे झालेले आहेत. तसेच मृत्यू पावलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे सानुग्रह अनुदानाची रक्कम अदा करण्यात आली आहे.

(२) शासकीय आश्रमशाळेतील मुख्याध्यापक, अधीक्षक, आश्रमशाळेत निवासी राहतात.

(३) सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधाव्यतिरिक्त आदिवासी विकास विभागामार्फत विविध कार्यक्रमांद्वारे आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांच्या सोयी सुविधेत वाढ करण्यात आलेली आहे. अटल आरोग्य वाहिनी योजनेंतर्गत या विभागाच्या अधिनस्त ३०१ अतिदुर्गम भागातील शासकीय आश्रमशाळांमध्ये क्लस्टर तयार करुन ४८ ॲम्बुलन्समार्फत विद्यार्थ्यांना वैद्यकीय सेवा

उपलब्ध करुन देण्यात येते. या कार्यक्रमांतर्गत दिड वर्षामध्ये १,७२,८६९ विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करून ४४,२७१ विद्यार्थ्यांवर आश्रमशाळेच्या सीकरूममध्ये उपचार करण्यात आले असून ७,६७२ विद्यार्थ्यांना रूग्णालयात दाखल केले व ६५ विद्यार्थ्यांवर विविध शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

उर्वरित २०१ शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना टेलीमेडीसीनद्वारे वैद्यकीय सुविधा उपलब्ध करुन देण्यात येते. या प्रकल्पांतर्गत वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पथकांद्वारे १,३०,६८२ विद्यार्थ्यांची तपासणी करून ६०६ विद्यार्थ्यांना रूग्णालयात दाखल करण्यात आले व ३८ विद्यार्थ्यांवर विविध शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

तसेच शासकीय आश्रमशाळांमध्ये स्वच्छता गृह/स्नानगृहांची दुरूस्ती, आवश्यकेतनुसार नवीन बांधकाम करणे, पाणीपुरवठा, भोजनगृह, हॅण्डवॉश स्टेशन्स इत्यादी सुविधा वाढविण्यासाठी वॉश कार्यक्रम राबविण्यात आला आहे. कायापालट अभियानांतर्गत शासकीय आश्रमशाळांना फर्निचर, बेंचेस, बेडींग साहित्य, कपाट, गाद्या, खुर्च्या इत्यादी साहित्य पुरविण्यात आले. तसेच शाळेच्या नियमित देखरेख व नियंत्रणाकरीता प्रत्येक शाळेत शाळा व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आली असून सदर समितीला किरकोळ दुरूस्तीकरीता निधी उपलब्ध करून देण्यात येतो.

विद्यार्थ्यांच्या आरोग्यांची पुरेपूर काळजी घेतली जाते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने आखलेल्या धोरणामुळे वीज निर्मितीवर परिणाम होत असल्याबाबत

**(६१) * १५४१ श्री.शरद रणपिसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, अॅड.हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, डॉ.सुधीर तांबे, श्री.आनंदराव पाटील, श्री.जनार्दन चांदूरकर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.अमरनाथ राजूरकर, डॉ.वजाहत मिर्झा :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अपारंपरिक ऊर्जा निर्मितीला गती देण्यासाठी सौर ऊर्जेची निर्मिती करण्याचे धोरण सन २०१२-२०१३ साली तत्कालीन मा.पंतप्रधानांच्या कालावधीत ठरविण्यात आले होते व केंद्र शासनाने यासाठी त्यावेळी ३० टक्के अनुदान दिले होते आणि तद्नंतर सन २०१५ साली राष्ट्रीय सौर ऊर्जा मिशन केंद्र शासनामार्फत जाहीर करण्यात आले व त्यानुसार सन २०२२ पर्यंत महाराष्ट्रात ४ हजार २०० मेगावॅट सौर ऊर्जेचे उद्दिष्ट देण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१५ ते २०१९ या चार वर्षात महाराष्ट्रात केवळ २६६ मेगावॅट सौरऊर्जा निर्मिती झालेली असून ही एकूण उद्दिष्टांच्या ६.६५ टक्के आहे व सन २०२२ पर्यंत ९३.३५ टक्के उद्दिष्ट गाठावयाचे आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या धोरणाऐवजी महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने सौर ऊर्जेची निर्मिती, वापर, मिटरींग आणि बिलिंग याबाबत नविन धोरण राबविण्याचे ठरविलेले असून त्यासाठी नविन मसुदा तयार केलेला आहे व त्यामुळे वीज निर्मितीवर विपरीत परिणाम होऊन वीज ग्राहकांवर मोठ्या प्रमाणात परिणाम होईल व या क्षेत्रातील सुमारे दोन हजार व्यावसायिक अडचणीत येणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०१२-२०१३ व २०१५ साली जाहीर करण्यात आलेले धोरण असताना त्यानुसार सौर ऊर्जा निर्मिती न होता ती मंदगतीने होण्याची कारणे, तसेच महाराष्ट्र वीज नियामक आयोगाने नवीन प्रस्ताव राबविण्याची कारणे याबाबत आढावा घेण्यात आला आहे काय, त्यात काय आढळून आलेले आहे व त्यानुसार वीज निर्मिती व व्यावसायिकांवर परिणाम होऊ नये यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत :** (१) केंद्र शासनाने दिनांक २६ जून, २०१४ साली छतावरील पारेषण संलग्न सौर ऊर्जा संयंत्रासाठी ३०% केंद्रिय वित्तीय सहाय्याचे धोरण जाहीर केले होते. तद्नंतर सन २०१५ साली केंद्र शासनाने राष्ट्रीय सौर ऊर्जा मिशन जाहीर केले. त्याअंतर्गत सन २०२२ पर्यंत ४०,००० मेगावॅट छपरावरील सौर ऊर्जा निर्मिती उद्दिष्टांपैकी महाराष्ट्रासाठी ४७०० मेगावॅटचे उद्दिष्ट देण्यात आलेले होते.

आता केंद्र शासनाने मार्च, २०१९ मध्ये पारेषण संलग्न रुफ टॉप सौर विद्युत संयंत्र-२ ही योजना जाहीर केली असून याअंतर्गत सन २०२२ पर्यंत संपूर्ण देशासाठी एकूण ४००० मेगावॅट क्षमतेचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

(२) महावितरण कंपनीच्या परवाना क्षेत्रात माहे डिसेंबर, २०१९ अखेर छतावरील पारेषण संलग्न सौर प्रणालींची एकूण स्थापित क्षमता ४४४ मेगावॅट इतकी आहे. त्यापैकी ११२ मेगावॅट घरगुती ग्राहकांनी स्थापित केलेली आहे. इतर वर्गवारीतील ग्राहकांनी स्थापित केलेली क्षमता एकूण स्थापित क्षमतेच्या ७५% आहे. सद्य:स्थितीत वाणिज्यिक आणि औद्योगिक ग्राहक प्रामुख्याने रुफ टॉप सौर यंत्रणा स्थापित करीत आहेत.

आता केंद्र शासनाने जाहीर केलेली पारेषण संलग्न रुफ टॉप सौर विद्युत संयंत्र-२ योजना राबविण्यासाठीची प्रक्रिया वीज वितरण कंपन्यांमार्फत सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिनांक २६ ऑक्टोबर, २०१९ च्या जाहीर सुचनेनुसार प्रारुप ग्रीडला जोडलेली परस्पर सक्रीय छपरावरील नुतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा विनियम, २०१९ चा मसुदा प्रसिध्द करुन त्यावर जाहीर अभिप्राय, सूचना व हरकती मागविल्या. प्राप्त झालेले अभिप्राय, सूचना व हरकती विचारात घेऊन आयोगाने वरील विनियम दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी अंतिम केले आहेत. ही व्यवस्था सर्व वर्गवारीतील वीज ग्राहकांसाठी लागू आहे. असे करत असताना आयोगाने ग्राहक, व्यावसायिक व वितरण कंपनी इ.च्या सर्वसमावेश हिताचा विचार केलेला आहे. औद्योगिक ग्राहकांनाही त्याचा लाभ घेता येईल.

(४) मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने छपरावरील सौर फोटो व्होल्टॅक यंत्रणाकरीता नक्त मापन, विनियम, २०१५ प्रसिध्द झाल्यानंतर छपरावरील सौर ऊर्जा निर्मितीत हवा तितका प्रतिसाद न मिळाल्याने व बदलत असलेल्या परिस्थितीचा विचार करता तसेच मोठे ग्राहक सौर ऊर्जा प्रकल्पाकडे वळल्याने होणाऱ्या क्रॉस सबसिडीच्या तोटयामुळे इतर ग्राहकांवर वीज दर वाढवण्याचे संकट येऊ शकते, अशी शक्यता महावितरण कंपनीने व्यक्त केल्याने या सर्वांचा आढावा घेऊन मा.आयोगाने नक्त मापन व्यवस्था, नक्त देयक व्यवस्था व ग्राहकाचा मीटरच्या मागे जोडलेली नुतनशील ऊर्जा

निर्मिती यंत्रणा इ.चा समावेश करुन ग्राहकांसाठी दिनांक ३० डिसेंबर, २०१९ रोजी ग्रीडला जोडलेली परस्पर सक्रीय छपरावरील नुतनशील ऊर्जा निर्मिती यंत्रणा विनियम, २०१९ अंतिमत: प्रसिध्द केले आहेत.

जेणेकरुन छपरावरील ऊर्जा निर्मितीस चालना मिळेल. तसेच मा.आयोगाने नुतनशील ऊर्जा खरेदी बंधनाचा (आर.पी.ओ.) लक्षांक सन २०१९-२०२० ला असलेल्या ३.५० टक्केवरुन सन २०२४-२०२५ पर्यंत १३.५० टक्के पर्यंत वाढ करुन सौर ऊर्जा निर्मितीस चालना मिळण्यासाठी महत्त्वाचे पाऊल उचलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अमरावती विभागातील शेतकऱ्यांना जाहीर केलेल्या सवलतीबाबत

**(६२) * ३७९ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.आनंद ठाकूर :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा या जिल्हयाची खरीप हंगामाची अंतिम पैसेवारी विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक २ जानेवारी, २०२० रोजी वा त्यासुमारास जाहीर केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पाचही जिल्हयातील प्रत्येकी हंगामी पैसेवारी किती जाहीर केली असून या विभागातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना कोणकोणत्या सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना सवलतींचा लाभ देण्याबाबत कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.विजय वडेट्टीवार :** (१) होय, हे खरे आहे.

अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा या जिल्ह्यांची अंतिम पीक पैसेवारी दिनांक ३१ डिसेंबर, २०१९ रोजी जाहीर करण्यात आली आहे.

(२), (३) व (४) अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, वाशिम व बुलढाणा या ५ जिल्ह्यांची अंतिम पीक पैसेवारी अनुक्रमे ४६, ४५, ४७, ४७ व ४३ टक्के एवढी आहे.

राज्यात अंतिम पैसेवारीच्या आधारे दुष्काळ घोषित करण्याची कार्यवाही केली जात नाही. दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ नुसार जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थितीचे मुल्यांकन करून विहित केलेल्या निकषानुसार दुष्काळ घोषित करण्याची कार्यवाही केली जात असल्याने सन २०१९ च्या खरीप हंगामात अमरावती विभागात दुष्काळ घोषित करण्यात आलेला नाही. त्यामुळे सवलती जाहीर करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बाळापूर, पातूर, तेल्हारा व मालेगांव (जि.अकोला) तालुक्यातील शेतकऱ्यांना चुकारे मिळाले नसल्याबाबत

**(६३) * १५८२ श्री.गोपिकिशन बाजोरीया : तारांकित प्रश्न क्रमांक ४८९६० ला दिनांक २८ जून, २०१९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बाळापूर, पातूर, तेल्हारा व मालेगाव (जि.अकोला) तालुक्यातील शेतकऱ्यांनी गेल्या खरिप हंगामात नाफेडला विकलेल्या उडीद, तूर आणि चणे या शेतमालाचा एक वर्ष उलटूनही चुकारे मिळाले नसल्याचे माहे डिसेंबर, २०१९ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन महिन्यात शेतकऱ्यांना चुकारे मिळणे अपेक्षित असताना एक वर्ष उलटून गेले तरीही चुकारे न मिळण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने यास जबाबदार असणाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील :** (१) नाही.
(२) व (३) हंगाम २०१८-२०१९ मध्ये किमान आधारभूत किंमतीने खरेदी केलेल्या उडीद, तूर व हरभरा (चना) यांचे शेतकरी चुकारे ऑनलाईन पोर्टलवरुन अदा करण्यात आले आहेत.

नाफेडकडून जसजसा निधी उपलब्ध होईल तसतसे शेतकरी चुकारे अदा केले आहेत. पोर्टलवरुन चुकारे अदा करताना जनधन खाते असणे, खाते non-operative किंवा dormant असणे, अथवा KYC पूर्ण नसणे इत्यादी कारणांमुळे रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होण्यास अडचणी येत होत्या. अशा प्रकरणी पुन्हा शेतकऱ्यांची माहिती घेऊन रक्कम वितरीत करण्यात आल्यामुळे विलंब झालेला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**श्री.राजेंद्र भागवत**
**सचिव (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.